

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

सं. नं.

REFBK-0005367

एकत्र प्रत
सं. नं.
ता.

१८३५

मराठी ग्रंथ संग्रहालय,
स्थळ प्रत
सं. काव्य नं. १११८..
ता. ..............
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नोंद नं. ५२...
ठाणे.

सरोजप्रकाशन संस्थेचें पहिलें पुष्पः—

# प्रतिमा

## ( काव्यसंग्रह )

५३८०
REFBK-0005367
REFBK-0005367

अनंत रावजी शिंदे

अध्यापक, राजाराम कॉलेज, कोल्हापूर.

आवृत्ति पहिली.

१९३५

किंमत १ रुपाया

मुद्रकः—
वासुदेव नारायण ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर.
चित्रकारः—बाळासाहेब गजबर.
सेलएजन्टः—स्कूल अॅन्ड् कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर.

पुढील आवृत्तीचे सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

प्रकाशकः—
बाळकृष्ण गोपाळ शिंदे,
सरोजप्रकाशन संस्था,
४८८० शुक्रवार पेठ, कोल्हापूर.

ग्रं. काव्य नं. ११८
ता.
ठा. नं.



ले. कर्नल सर श्री. राजाराम छत्रपती महाराज
जी. सी. एस. आय, जी. सी. आय. ई.
सरकार करवीर.

सत्यवादी स्टीम प्रेस, कोल्हापूर.

# अर्पण-पत्रिका

ज्यांच्या वैभवशाली पुण्यभूमींत हा काव्यसंग्रह

छापण्याचा योगायोग आला त्या

श्रीमन्महाराजछत्रपति

## राजाराम महाराजसाहेब

करवीर यांच्या

**अमर्याद**

कलाप्रियतेवर व निस्सीम शिक्षणप्रेमावर

लुब्ध होऊन ही माझी प्रथम काव्यकृति त्यांच्याच

आज्ञेनें त्यांना अत्यंत आदरानें अर्पण केली आहे.

चक्रवाक.

# प्रवेशापूर्वी

येथें आज चार शब्द लिहितांना मनांत भावनांचा हलकल्लोळ माजला आहे. महाराष्ट्रीय वाचकांसमोर नव्यानें पुस्तकरूपानें प्रवेश करतांना माझ्या बालपणाच्या आठवणींवरून एकदां मन-श्चक्षू फिरविल्यावांचून मला गत्यंतर नाहीं. सात वर्षांचा असतांना राजापूरच्या शाळेंत मराठी तिसऱ्या यत्तेंत 'बरें सत्य बोला' ह्या ओळी म्हणतांना प्रेमळ ठाकूर देसाई मास्तरांनीं 'खालीं बस्! कर्कश आवाज गुलामाचा!' असा मारलेला शेरा व त्यानंतर राजापुरासच इंग्रजी पहिल्या यत्तेंत असतांना मराठीचे तास घेणारे गुलहौसी ड्रॉइंग मास्तर रानडे यांना खड्या सुरांत 'पाषाणाचे पोटीं बैसला दर्दूर' गाऊन दाखविल्यानंतर 'लेका! शिंदे ज्या सणसणींत आवजांत म्हणतो तशा आवाजांत म्हण कीं!" असें वर्गांतील नेभळट मुलास बजावून सांगून पुन्हां एकवार मला कविता म्हणावयास लावून केलेल्या प्रशंसेची आठवण पुन्हां आज जागृत होत आहे. ह्या दोन विरोधी घटनेंतच माझ्या भावी प्रतिमेचें बीज होतें कीं काय असें मला कधीं कधीं वाटूं लागतें. आजच्या या संग्रहाला निरनिराळ्या गोष्टी कारण झाल्या आहेत; हें निराळें! असो.

गेल्या सहा वर्षांच्या कालावधींतील कविता या संग्रहांत प्रकाशकांनीं समाविष्ट केलेल्या आहेत. त्या सर्व यापूर्वीं मासिकांतून व साप्ताहिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. विडंबनास काव्याच्या कसास लावून बघण्याची वाचकांस व टीकाकारांस मनाई आहे. या संग्रहांतील सर्वांत जुनें काव्य लिहिलें जाण्यापूर्वींचे म्हणजे

१९२६ सालीं खंडकाव्याच्या कल्पनेनें डोक्यांत ठाणें दिलें होतें. हें एक आश्चर्यच आहे ! त्या कल्पनेला १९३२ सालीं चालना मिळून तिची पूर्तता दोन महिन्यांपूर्वींच झाली. या काव्याचा तीन चतुर्थांश भाग अवघ्या महिन्यांतच लिहून झाला असल्यानें त्यांत बरेच दोष राहून गेले आहेत त्याबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे. येथील राजवटी वातावरण व निसर्गाची शोभा हीं माझ्या खंडकाव्यांतील कांहीं भागास पोषक झालीं आहेत असें नमूद केल्यास अवास्तव होणार नाहीं असें वाटतें. खंडकाव्याला थोडेंबहुत जें चांगलें स्वरूप आलें आहे तें आमचे मित्र कविश्रेष्ठ चंद्रशेखर, कवि पत्की बी. ए., कवि राजस यांनीं केलेल्या सूचनांमुळेंच आहे हें सांगण्यास आनंद वाटतो. विशेषतः राजकवि चंद्रशेखर यांनीं उतारवयांत असूनही अत्यंत परिश्रम घेऊन ज्या सूचना केल्या व विशिष्ट लोभ दाखविला त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे. त्याचप्रमाणें करवीराधिपति श्रीछत्रपति राजाराम महाराज यांनीं स्वतःस हें पुस्तक अर्पण करण्याकरितां जी परवानगी दिली त्याबद्दल त्यांचें आभार मी कोणत्या शब्दांत मानूं हेंच मला कळत नाहीं.

शेवटीं सर्व दोष बाजूला सारून वाचकवर्ग हीं माझी पहिली कृति गोड करून घेतील अशी आशा बाळगून येथेंच आटपतें घेतों.

२६१ शिवशक, शिवजयंतीदिन
व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग
कोल्हापूर.

चक्रवाक.



कवि चक्रवाक.

# वाचकाशीं हितगुज-

आज ह्या प्रकाशन क्षेत्रामध्यें पाऊल टाकतांना पहिल्यानें जरा भीतिच वाटत होती. परंतु प्रेमळ मित्रांच्या चेतवणीनें भीतीची जागा उत्साहानें घेतली.

बडोदें व कोल्हापूर येथें प्रसिद्ध असलेले कवि ' चक्रवाक ' ह्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध करतांना, मला एक प्रकारचा आनंद होत आहे. त्यांनीं थोडी फार झीज सोडून व लॉ कॉलेजमधील टर्म्स व आर्ट्‌स् कॉलेजमधील अध्यापकत्व व जोडीला प्रकृतीचा अस्वस्थपणा संभाळून माझ्या विनंतीला मान देऊन खंडकाव्य तयार करून दिलें ह्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

कोल्हापुरचे सुप्रसिद्ध तरुण चित्रकार बाळ गजबर ह्यांनीं चित्र काढून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेंच ह्या पुस्तकाची छपाई लवकर व सुबक करून श्री. ठकार ह्यांनीं मला उपकृत करून ठेविलें आहे.

श्रीयुत बाळासाहेब पाटील ह्यांनीं श्रीमत् छत्रपति राजाराम महाराज सरकार करवीर ह्यांच्या फोटोचा ब्लॉक छापून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

अखेर भावगीतें, विडंबनें ( Parodies ) व खंडकाव्य ह्यांनीं विनटलेला हा महाराष्ट्रांतील पहिलाच संग्रह वाचकांस प्रेमानें सादर करीत आहें.

सरोजप्रकाश संस्था<br>
४८८० शुक्रवार १।५।१९३५.

बी. जी. शिंदे.

श्रीसिद्धेश्वर प्रेस, कोल्हापूर.

संकल्पित प्रकाशन—

आशाबंध—के. डी. पेडणेकर B. A.

दिलरुबा } खंडकाव्यें
अंजिरा } कवि चक्रवाक.

समुद्रकांठीं

छाया

---

सिद्धप्रकाशन संस्थाः—

# हृदय-भाव

एका कॉलेजकुमाराचें भावनात्मक लिखाण.

लेखकः— पां. तु. कांदळगांवकर

# अनुक्रमणिका.


| काव्यविषय | पृष्ठ |
|---|---|
| वनक्रीडा | १ |
| वाळवंटांतील सायंकाळ | २ |
| चंद्राशीं विनोदन | ३ |
| युगांतर | ५ |
| काळ | ६ |
| सौंदर्यशालिनीस | ७ |
| खूण! | ८ |
| इंगित | ९ |
| सौंदर्य आणि निराशा | १० |
| चल, सोड हात– | १२ |
| झेला | १४ |
| परत फेड | १५ |
| प्रेम व दिशाभूल | १७ |
| याचना! | २२ |
| रम्य काय? | २३ |
| भास! | २४ |
| शकुंतलेचें पत्रलखन | २५ |
| दारांत उभी– | २६ |
| गडकऱ्याच्या पोरीचें गाणें | २७ |
| शिलेदार | २९ |
| दिवंगत गेहिनास— | ३१ |
| शृंगारसाज | ३३ |
| गुंफलेली माळ | ३६ |
| सूर्याजीचा इषारा | ३७ |
| वृद्ध भोजनभरव | ३८ |
| कॉलेजांतील मुलाच गाणें | ३९ |
| कवि संमेलन | ४१ |
| माझी सखी | ४२ |
| बकुलराय | ४३ |
| प्रतिमा (खंड काव्य) | ४७–१०० |

# वृत्तें, जाति, छंद.

| | |
|---|---|
| नवक्रीडा— | केशवकरणी |
| वाळवंटांतील सायंकाळ- | आनंदकंद |
| चंद्राशीं विनोदन— | पांखरा! येशिल |
| युगांतर— | कृपी स्वर्गंगा |
| काळ— | शार्दूलविक्रीडित |
| सौंदर्यशालिनीस— | भूपती |
| खूण!— | अभंग |
| इंगित— | गज्जल |
| सौदर्य आणि निराशा— | स्वर्गंगा |
| चल, सोड हात— | नको, नको संसार |
| झेला— | गज्जल |
| परत फेड— | निजल्या तान्ह्यावरी |
| प्रेम व दिशामूल— | नृपममता |
| याचना!— | शार्दूलविक्रीडित |
| रम्य काय?— | ” |
| भास!— | मंजरी |
| शकुंतलेचें पत्रलेखन— | जमुनातट |
| दारांत उभी— | भिल्लीण |
| गडकऱ्याच्या पोरीचें गाणें— | सख्या सजणा! |
| शिलेदार— | स्वर्गंगा |
| दिवंगत गेहिनीस— | भूपती |
| शृंगारसाज— | मंजरी |
| गुंफलेली माळ— | चंद्रकला |
| सूर्याजीचा इषारा— | मोहिनी |
| वृद्ध भोजनभैरव— | मुद्रिका |
| कॉलेजांतील मुलींचें गाणें— | झिम्मा |
| कविसंमेलन— | दिंडी |
| माझी सखी— | पहा! माझी बेबी |
| बकुलराय— | पांडवप्रतापी |
| प्रतिमा— | सूर्य कांत |

(ओळी ३७–४० चंद्रकांत)

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वतंत्र प्रत
सं. ग्रान्थ नं. ११९८
ता. ..........
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५२०६
ठाणे.

# वनक्रीडा—

५३६८

—:०:—

प्रभातकाळीं मंदगतीनें अफाट माळावरी,
चालली बाला कोणी तरी.
हिमकणमार्जित पुष्पें खुडुनी स्वकरें प्रमुदित मनें,
फेंकिलीं परडीमध्यें तिनें.
रानफुलें तीं विविध लतांचीं रम्याकृतिचीं किती!
गंधमय होउनि गेली क्षिती.
पायीं पैंजण निनाद करिती वेडावति वनचर;
संनिध आलेही रविकर.
भव्य निटिलतटिं मौक्तिकसरयुत माळ गुंफिली कुणी?
वेगळा तिचाच आहे धनी!
कनकमेखलाघण्टिकारवा अनुसरुनी मृग तसे—
चालती मागुन वेडे पिसे.
मृदुलतृणाची शाल पसरली होती वसुधेवरी,
शरदिंची शोभा अनुपम खरी,
परडीमधलीं फुलें उधळिलीं पवनानें दुरवरी,
लागली वेंचाया साजिरी.

झाडींतुनि तंव फडक् फडक् ती उडे विहंगावली,
जिथेंच्या तिथेंच ती थबकली.
प्राण जिवाचा, तिच्या दिलाचा, तिथें कुणी पातला;
सुपुष्पें वेंचाया लागला.
वेणीमध्यें फुलें खोंवुनी तयेंच त्याच क्षणीं,
लागलीं चालूं दोघेजणीं.
दुर्धर गहना तरुराजीतें असंख्य ओलांडुनी,
पातला तो ग्रामालागुनी.
लग्नसोहळा, असा जाहला, कुणी न कधिं पाहिला,
भेटण्या ये नित्यचि तो तिला.
कवि आणिक ती कविता त्याची राज्ञी मनमोहिनी,
मांडिती अशाच केली वनीं.

एप्रिल १९२८

---

# वाळवंटांतील सायंकाळ—

नाचे द्वितीय विधुची प्रतिमा समुद्रभागीं;
नौकाहि कांठच्या ह्या जमतात जागजागीं.
उचलोनि धीवरांनीं पाण्यांतलींच जाळीं,
सजले घरास जाया तिनसांज फार झाली.

उजवीकडे पसरल्या किल्ल्यावरी जुनाट;
दीपप्रकाश सुचवी कीं येइ आगबोट,
खुदकन् जशाच हंसती युवती, तशाच लाटा—
पाहून यांस चढतो अंगावरून कांटा.
जलदेविच्याच असती या काय पायवाटा ?
रात्रीं करीत नृत्यीं असतील त्या चव्हाटा !
आले फिरावयातें जन येथलेच कोणी;
गेले फिरून मागें फुलल्याहि रातराणी.
या वाळुकीं बसोनी जीं खेळलीं मुलें कीं;
गेल्याहि पद्मनयना कोणी उरे न बाकी.
या भग्न गलबताशीं मित्रा ! बसोनि तूं मी;
बोलूं असे सुखांत झूळझूळ वात नामी.
गाणें करूं परंतू विनती करीत तुजला,
अंधार घोर पडला चल, जाउंया घराला.

२२–८–३०

---

## चंद्राशीं विनोदन—

चंद्रा ! हंससि मजसि देखून !
श्यामलपर्णामागें छपुनी
कुत्सित भाव धरून ! चंद्रा !

वास कुठें गणगोत, कुठें तव
   गगन कुठें तेथून ! चंद्रा !
दृष्टि न किंचित् हलविशि अथवा,
   बघत मघांपासून ! चंद्रा !
निशासखीचा कटिभागाचा
   विळखा दूर करून ! चंद्रा !
परजाया मी मला मोहिनी—
   घालुं नको हांसून ! चंद्रा !
प्राणविसांवा परगांवाला
   संधि अशी साधून ! चंद्रा !
शीतल स्पर्शा धजसि कराया
   विनय कसा सोडून ! चंद्रा !
चेटकीच तूं ! उभा कशाला ?
   घेशिल रे ! शासून ! चंद्रा !
भोळी नाहीं—नजर नको ही
   चल जा तूं येथून ! चंद्रा !

१-६-३१

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. ग्रान्थ नं. ११९८
ता.
अ.



मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ८२७८
ता.

# युगांतर

—:०:—

आशावृक्षीं पुष्पें विकसुनि फळें कधीं तीं येणार ?
आणि पांखरें खाणार ?
अंध पाखरूं गाणें गातें एकांतांतचि बहु नामी;
कळेल कां तें या जन्मीं ?
मोहक गाणें कुशल नटाचें रंगभूमिवरचें फार;
टिपण कोणि तें करणार ?
दुर्दैवाचा छापा पडला करी तयारी कशी तरी;
सुटका नसते खरोखरी !
आग लागतां सोंसाट्याचा वारा सुटतो बहुतपरी;
खडा तयाला कोण करी ?
वरल तारका नभाभीतरीं लुकलुकती त्या अनिवार;
जन्मनोंद कधिं होणार ?
गरुडभरारी मारुनि जातो पतंग स्वबलें नभान्तरीं;
मिळेल कां तें त्यास तरी ?
ऐपत सोडुनि उगाच अपुला हात घालि जो मोठ्याला
येइल कधिं तें हाताला ?
हातावरच्या रेषा मुळच्या सुखदुःखाच्या खालिंवरी;
पुसतिल केव्हां घरोघरीं ?

काल उलटुनी सर्वांचि असलीं अगम्य गूढ विदित करी;
वंदन त्या नव युगा करी-

२५-५-२८

---

## काळ—

गांठा हा भरधांव अश्व सुटला कोणी तरी तत्पर्थी,
रत्नें सुंदर, दागिने सुबकही द्याया करा त्याप्रती;
नाहीं थांबत थांबणार कधिं तो? हेंही नसे निश्चित,
मारी दौड युगायुगांतुनि पुढें आजन्म अव्याहत.
स्वर्गींचे नवकुंभ पैं उचलुनी पीयूष आणा, तया—
द्या प्याया, मन शांतवा कुणि झटा सांगाचि थांबावया;
न्हासा नेउनियां सुवर्णपुरिचीं राज्यें सुधीं प्राचिन,
पार्श्वीं टाकुनियां गिळंकृत करी उन्मत्त! अर्वाचिन.
याला आदि न अंत मग्न पुढतीं चाले कुठें एकटा?
नाहीं तत्सम दक्ष कोणि अपुल्या कार्यान्तरीं तत्वतां;
ज्वाला दीप्त गमे नसांत जळते वा सारखी पेटते,
कोठें सांडुनियां क्षणैक पडतां त्या जाळते पोळते.
ज्यातें 'काळ कराल' सुज्ञ म्हणती तो हा असे मत्सखा;
नाहीं जाणिव येत कांहिं कवणा कां धांवतो हा फुका!

१९२८

---

# सौंदर्यशालिनीस–

सौंदर्यशालिनी! कुठें भूतलावरतीं—
जा; तुला पहाया मिळेल माझी मूर्ती.
तूं सुंदर म्हणुनी प्रेम तुजवरी केलें;
तें अक्षय वाढत उधानापरी गेलें.
तों अवचित धरुनी हात कुणीसा तुजला;
येतेस काय तूं? म्हणुनि तुला तो वदला.
राहिलें भान नच चळलें तव मानसही;
तूं दृष्टि वळविली—पुन्हा पाहिलें नाहीं.
जाशील दूर तू प्रत्यहिं कोठें कोठें,
अनुभवही तुजला येतिल अगदीं खोटे;
किति भाळुनि झटतिल लावायातें वरणी,
किति मिठास बोलुनि रमतिल तुझिया चरणीं;
तूं सुखांध होउनि बघशिल त्यांच्या नयनीं,
जी छाया मन्नेत्रींच पाहिली खिळुनी
सौंदर्यशालिनी! कुठें भूतलावरतीं;
यापरी पहाया मिळेल माझी मूर्ती.

१९३३

८

# खूण !

काय तुझे मनीं, सांग माझे कानीं
जाशी रागावूनी, जिवलगे !
जावूं नको दूरी, बैस ये शेजारीं
लाजुं नको भारी, अंतरीं तूं.
जरी मी भिकारी, आहे या संसारीं,
तुझी हौस सारी, पुरवीन.
पेठेंत धुंडून, गल्लींत लपून
आणिली जपून, तुज मी ना ?
तुवां विश्वासून, माझ्यावरी पूर्ण
पदासी अर्पण, केलेंस ना ?
यौवन संपदा, नाहीं मज सदा,
वार्धक्याची बाधा होणार गे !
झालीस पारखी, जरी मला तूं कीं,
ओळख तूं पक्की, ठेव परी.
घाली ही हांसत, अंगठी हातांत,
खूण ही लक्षांत असूं दे ग !

४-५-३२

# इंगित–

( दैववादी मनुष्याची अशी स्थिति होत नसेल काय ? )

‘ कथीं रे ! सागरा मातें ऊर्मि या रंगती कां च ?
मला या मुग्ध प्रेमानें अशा वेडावती साच.
सदा या एकमेकांशीं भिडूनी वंचका हाय !
न लागे थांग गूढाचा अशा या गुंजती काय ?
–असा वारीशिपायांशीं किनारा होउनी लीन,
रहस्या सांग त्या प्रार्थी वदे त्वत्पांग फेडीन.
नभीं मज्जीवनाच्या कीं सुतारा–दैव देखोनी
धरूं मी जात ती तेवीं करीं ये रंग अस्मानी,
धृतीचा लावुनी नेट पुढें मार्गास हांकारी
प्रयत्नांनीं सुधें वाटे परी हो चित्त चित्कारी !
सुखाशा ना, निराशा ही मिठी घाली सदा मातें,
श्रमानें दुष्ट अंधारी सदा नेत्रांस ही येते.
प्रभो ! वारूच दे माते यशाचा वा कथी कलशी;
नको रे ! अंत हा पाहूं कसा हो तूंच मध्यस्थी !

१०–१२–२९

# सौंदर्य आणि निराशा

( उद्वेगपूर्ण मनुष्यास स्वप्नांत त्याच्या सर्व आशा पूर्ण झाल्या असें कधीं कधीं वाटतें व सौंदर्याची साक्ष पटते परंतु तोच पुन्हा जागा झाल्यावर त्याला सर्व सृष्टि निराशाजनक व सौंदर्यहीन भासते, हें ह्या पद्यांत सांगितलेलें आहे. )

" बोल राजया ! असा कांसया ? मलूल अगदीं तूं दिससी;
कुण्या युवतिच्या सदय मनाच्या सौंदर्यीं वा स्मरसी.
उद्वेगाच्या छटा पसरल्या निष्ठुर खोट्या मुखावरी
कधीं हांससी कधीं बरळसी सांप्रत सारें बोल तरी !

आजुबाजुला शिलासमुच्चायिं खेळ खेळते निर्झरणी
अनिलकंपिता स्वैर नाचती कुसुद्रुती या पहा झणीं ;
नव पल्लवयुत फुलवंतीचे बागबगीचे बघ फुलले
घोंस फळांचे दाडीमांचे नयनसुभग हे किति सजले."

" कुठें अरण्यीं निद्रित असतां सुंदर रमणी मज दिसली
नाचत नाचत हांसत हांसत समीप येउनियां बसली;
तिनें फेंकिलीं मद्देहावरि फुल्ल लोचनें चोहिंकडे
मन्मानस त्या योगें अवाचित प्रहृष्ट होई येइ रडें.

सहजमनोहर हातां फिरवुनि स्पर्शहि केला वामांगीं
रोमांचित मम काया नटली काय असे हें मी शंकी;

विमल शिंपुनी जलवृतीतें जागृत केलें मला झणें,
मंद समीरण दुकूल वसनें घालुनि, निद्रा मज आणी

तऱ्हेतऱ्हेनें सुस्वर कंठें कवनें सारीं तीं म्हणुनी,
रिझवी मातें परोपरीनें सर्व समर्पण करि चरणीं.
स्वर्गींची ती दिव्य परी, शशिप्रभाभिरामा कांति तिची
अधर हालवी कटाक्ष उडवी गूढें कथि मज विश्वींची;

इकडुनि तिकडे गोष्टी सांगुनि मला पाडुनी भुलावणी,
अमुद्त प्रेमें घालि मोहिनी आयतनयना शुभाननी;
हातीं धरुनी नेत कुणिकडे नेऊं दिधलें स्वस्थपणें,
ख्यालिखुशालींत मीही गढलों विस्मरलों मम रडगाणें;

निरभ्र निर्मल मानस झालें कष्ट विसरलों ते सारे,
सौख्यसुधाडोहामधिं बुडलों, ईर्षेचें भरलें वारें;
बागबगीचे साधे जरि ते नंदवनिंचे मज गमले;
संदेहाचीं रुक्ष उडालीं नयनांवरचीं मम पटलें.

मित्र सोयरे बोट दावुनी लज्जेस्तव तेही पळती,
पर्वा तेव्हां मला कशाची तुच्छचि सारे मज गमती;
कष्ट सोडुनी ईप्सित ऐसें ज्याच्यासाठीं मी झटलों
एकाएकीं असें साधलें यास्तव माझा मी हंसलों.

परि दुश्चिन्हें भीषण शब्दें तिमिरें भरलें जग अवघें
पुढें देखिलें; रमणी तीही चुकली कोठेंशी मागें;

स्खलित तसा मी कर्दम फत्तरिं अज्ञात अशा पथावरी
सैराट पुढें वृथा चाललों, घोर विलक्षण मज घेरी.

तोंच फांकली दिशा, कोंडली तेजाची वाहे सरिता
स्वप्न संपलें ज्ञात जाहलें संस्मृतिचें दडपण चित्ता.
मडकें फुटकें, खोपट पडकें, रोगट मज्जीवन दिसलें;
तेव्हांपासुनि असाच बसुनी अश्रूंनीं शिंपीत मळे.

नोव्हेंबर १९२८

---

## चल, सोड हात—

कां करिसि असा अनिवार । उगा अविचार ?
पितयानें प्रेम कराया
तव, सवलत दिधली वायां
तूं बळेंच लावुनि माया
गळ टाकुनि मजला मासळीपरी ओढुनि केला वार.
ही कुटिल तरळ तव नजर
चुंबनास आतुर अधर,
कंठांतिल वाणी मधुर
मज जादू यांनीं करुनि वाढला प्रेमाचा उपहार.

पारि अपुल्या मधु प्रेमांत
विषमता उभी इतुक्यांत
कळुनियां मला हें येत;
त्या वेळेपासुनि राख फांसुनी फिरतों दारोदार.
श्रीमंत तुझ्या प्रेमानें
स्थापुनी हृदीं भक्तीनें
मूर्ति तुझी; मी रत्यानें
वध रखडत फिरतां, जुमानिलीं नच निद्रा, भय, आहार.
भडकलें चित्त त्यासरसें,
आशांचा मम डोंब दिसे
तों अवचित सांगु कुठेसें;
मज कळून आलें, बोहल्यावरी उद्यांच तूं चढणार.
आलों मी भेटायला
किति आतुरता चित्ताला!
ओळखलें कां तरि मजला?
मी भकास भटकत वैराग्याच्या वेषामधिं लाचार.
जाणार दुज्याच्या हातीं,
देउनियां मूठचि माती,
प्रेमाला आपुल्या ना! ती;
त्यासवें समज कीं समूळ अपुलें नातेंही तुटणार.
दैवाचा कोपचि झाला,
या उप्पर कीं अपुल्याला
एकत्र न वागायाला;

हा विचार करितो तुझा तसा वध माझाही संहार.

लाविशी पदर डोळ्यांला

हृत्सागर कां कळवळला ?

परि उपाय आतां कसला !

चल, सोड हात; जा नांद सुखानें, माझा मी मुख्त्यार.

आवरुनी धरिं हा शोक

नाहीं तर जातों देख

धरुनियांच पुढतीं रोंख !

मी शपथ सांगतों खुला असे मज मरणाचा दरबार.

मागुनी उण्या अधिकाची

शेवटीं क्षमाच दयेची,

मी असाच जाउनि अमुची,

कां ताटातुट ही केली म्हणुनी देवाला पुसणार.

एप्रिल १९३३

---

# झेला–

ती आठवे तुला का ? राया ! सुरम्य वेळा,

सुचवीत भाग्य होता डावा लवून डोळा;

गेलेंच दूर होतें कोठें महोत्सवास,

आणूनियां तिथूनी दिधला करांत झेला.

होत्या तिथें जहाल्या महिला बहूत गोळा,
वनदेवताच आल्या जणूं सोडुनी वनाला;
दाटींत तेथ मातें कोणी न जाणणारा,
--चिंता अशी, कुणी तों दिधला करांत झेला.
हिणवून तोंच राया ! वदलें उभ्या स्त्रियांला
' बिनचूक ओळखीलें त्यांच्याच या प्रियेला '
तेव्हां तुझ्या स्मृतींनीं आला भरून ऊर,
नादांत त्याच आलें परतूनियां घराला.
पुसतां तुवां, ' कसा गे ! तुज लाभलाच झेला ' ?
मी स्थापिला तुझ्या रे ! हृदयावरीच त्याला;
' माझा न तो ' म्हणालें शरमून अंतरीं या,
हर्षांत मारिली अन् तूझिया मिठी गळ्याला.
नांवामुळेंच तूझ्या झेला मला मिळाला;
ही कल्पना कधीं रे ! वच सोडिना मनाला !

---

## परत फेड

देउं काय मी तरी ? उदारा ! बोल ! बोल ! झडकरी
अनंत उपकारांच्या राशी
करुनि ठेविल्या फेडायासी

फेडुं कशी मी ? शक्य न मजसी,
काय प्रिय करूं तरी ? उदारा !
तव चिरलेलें हृदय पाहुनी
तव आनन हें म्लान देखुनी
टिपें वाहती मम नयनांतुनि
कष्टी कां यापरी ? उदारा
हृदय मम तुझ्यासमिप वागतां
तीव्र दुःख तव होतें चित्ता
ओळखितें अंतरिची चिंता
कसें समजवूं तरी ? उदारा !
माहित तुज की मी परदारा
कधिंच जुंपलें मी संसारा !
प्रेमाखेरिज माग उदारा !
वागूं पहिल्यापरी ! उदारा !
जर मजविषयीं प्रेम तव मनीं
हात फिरवितें नयनांवरुनी
जाईल मग तें साफ जळोनी
श्रमूं नको अंतरीं ! उदारा !

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्र. काव्य सं. ९९१८
ता.
ठाणे.

# प्रेम व दिशाभूल

—○—

( कै. गोविंदाग्रजांच्या 'वेडा' या कवितेवरून या कवितेची मध्यवर्ति कल्पना सुचलेली आहे; व सुंदर स्त्री शशिमुखी असते या कविसंकेतावर या कवितेची उभारणी केलेली आहे. )

Love is an unerring light,
And joy its own security.
Wordsworth.

कुठल्याशा हमरस्त्यांत
एकटा भिकारी जात । एकदां,
लक्तरें लोंबतीं होतीं
मळकटशीं अंगावरतीं । घातलीं;
दाढीचें विद्रुप जाळें
पसरलें मुखावारि काळें । त्याचिया,
सर्वांगा येई घाण
सारखे मागुतीं श्वान । चालती,
घातल्या गळां सुममाळा
वाहिल्या कुणीं देवाला । मंदिरीं;

तो गात
बहु त्वेषांत
गीतगंगेंत
वाहुनी जात । गाण्याला त्याच्या अंत । ना दिसे.
मधुरशी आणखी त्यांत
चांदणी चहुंकडे रात । पसरली,
निजलेली जनता शांत
सांपडला हा एकांत । त्याजला.
घेतली सुरेलचि तान
गायनीं गमे बेभान । जाहला;
खडबडले सारे लोक
'जाहलें काय तें देख' । बोलती.
हें पिसें,
स्वतःशीं हंसें
कळावें कसें !
त्याजला इतुकें । कीं बघती जन ते कुतुकें । त्याकडे.
वेडा हा इहलोकींचा
बांधला नसे कोणाचा । तत्वतां;
त्या आशा, वैभव, मरण
यापैकीं एकहि कधिं न । जाळिती,
अवलंब करी सत्याचा
प्रतिनिधी असे देवाचा । योजिला,
विश्वाचा गोल तयाला
हा अखंड भटकायाला । ठेविला;

आहार,
भीति अनिवार,
झोंपही फार
गांजि नच त्याला । एकटाच जगतामधला । दूत हा.
त्याजला वेड पारि साचें
तें एका रूपमतीचें । लागलें;
रात्रंदिन तिचिया ध्यानीं
बहकला अखेरचि प्रेमी । हा असा;
मुखमंडल त्या देवीचें
जणुं दुजें रूप शशिनाचें । भूवरी,
वसुधातालिं चीजाचि दुसरी
याविनाच नव्हती प्यारी । त्याजला.
त्यामुळें
असें कीं कळे,
वेड उमटलें,
मनीं हें त्याच्या । पारि कांहिं न त्याची वाचा । वदतसे.
चालला पुढें ओघांत
पाहुनी इंदु गगनांत । तेवता,
तो बोले कीं स्वमनाशीं
मम दयिता अगदीं ऐशी । प्रेमला,
या उंच गवाक्षामधुनी
पाहते तीच मनरमणी । मजकडे;
मद्दर्शन होतां साचे
उमटले किती रोमांचे । तनुवरी.

एकली,
अशी या स्थळीं,
मला लाभली,
बहुत दिवसांनीं । ही येथें प्रेमळ राणी । मम अशी-
मंजुले ! डोलवी मान
जीवाचें केलें रान । ज्यास्तव,
फसवी नच आतां मजला
जन्मवेरी दारावरला । याचक;
कासाविस मी हैराण
अप्रतिहत तव संशोधन । करितसें,
मनिं कैक सुखाशा धरुन
जीवाचें करि संगोपन । प्रत्यहीं;
टाकुनी,
मंदपद झणीं,
गालिच्या वरुनि
येइ अंथरल्या । हरितशाच या गिरिवरल्या । सावध-
पातला भटकुनी अंतीं
तो भीषण वापीकांठीं । दूरच्या,
वायूच्या मृदु स्पर्शानें
जल आंतिल हो मोदानें । कंपित;
थैमान घालुनी वारा
झाडांतुनि घेत घुमारा । चहुंकडे;
डोकावुनि अंतरिं पाही
जवळी ये तें लवलाही । शशिमुख.

आनंद,
करी त्या धुंद,
प्रीतिनें अंध,
होउनी भ्रांत । टाकिली उडी निमिषांत । हांसुनी.
प्रेमाचें जग हें सारें
प्रेमाचे गोड पसारे । पसरले;
प्रेमानें होतां कष्टी
दुसरिकडे भ्रमते दृष्टी । यापरी;
तेथेंच होउनी खूष
सोशिति असा हा नाश । सर्वथा.
हें प्रेम,
पाहि नच साम,
सकलसुखधाम
व्यापि विश्वाला । आणितें जवळ स्वर्गाला । यापरी.

५३६०

# २२

# याचना !

—:०:—

चंद्रामागुनि रोहिणी फिरकते आकाशपंथावरी,
गिर्यालिंगन तारका अनुदिनीं ती वांछिते अंबरीं,
नादाला श्रवण्यास मुग्ध चपला मेघांचिया धांवते;
होई साध्य न त्यांस कल्पवरि हें आशा परी वाटते.
आशेच्या चढत्या कलेंत लटकी जादू अशी ही वसे
कीं सौख्यैकनिधान दूरवरचें आम्हांपुढें तें दिसे;
आशेच्या हृदयांस हस्तगतसें दुष्प्राप्य जें जें जनीं
कां ना ? टांगुनि राहणार प्रणयीयुग्मेंच आशा गुणीं !
जेथें प्रेम जडे विलक्षण असें कोठें दुरी राहुनी,
देवा ! प्राप्त न भेट कां मग तयां विभ्रांतरींही असे ?
तो तीच्याविण शून्य-खिन्न मनिं ना ! ती-त्याकडे पाहुनी
प्रेमानें झुरती विचार करतां सर्वस्व वाहीनसें.
प्रेमाची दुनिया अशीच फुलते देई फुलें ही अशी !
माझी आसवती विवर्ण रमणी ती भेटवी कीं कशी !

१९२८

—

# रम्य काय?

रम्या, ती विधुवल्लरी चमकतां शुक्रासवें प्रांगणीं,
त्यांचें तेज महीवरी विलसतें—ती वेळ रम्या जनीं;
एकांतीं विजनांत बाल सरिता वाहे कुठें संतत,
प्रातःकाळिं बलाक तींत दिसतां तें रम्य अत्यद्भुत.
तारांचीं अतिरम्य दिव्य किरणें वा शुभ्र तें चांदणें,
तो सूर्योदय ती प्रभाच न कुणा हें आवडे पाहणें!
पुष्पा पल्लवपाश, काव्य कविला, वा बालिकेला फुलें;
दृष्टि स्निग्ध मनोहरा, स्मितमुखी सारें गमे चांगलें.
चित्रें रंगविलीं हुबेहुब पुढें तीं चित्रकारें पटीं;
सौंदर्यें श्रमदुःखताप हरुनी संतोष देती अती,
वाद्यांचे मृदुनाद मंगल कुठें, गाणें प्रभातीं तसें,
आनंदातिशयास देत, विलया खेदास तें नेतसे.
हीं सारीं अतिरम्य तुच्छ मज हें होई मनोल्हासक,
कोपोपाहितबाष्पसिक्त बघतां काम्य प्रियेचें मुख.

१९२८

# भास !

—०—

कमरेस घेउनी घागर विहिरिवरी,
चालतां रुझुणू पैंजण पायीं करी;
भासतें मागुतीं चालतसे कुणि तरी,
क्षणिं पदर लपेटुनि राहि उभी बावरी.

आरशांत बघुनी करतां वेणीफणी,
भिंतीच्या मागें साद घालितें कुणी;
मी धांव घेतसें ऐकुति ती कुणकुण,
परि भास निवळ तो खट्टू होई मन.

मम उत्तर म्हणुनी लिहावयातें धरी,
लेखणी चांचपत कशी तरी मी करीं;
परि अपुरें राहिल लेखन, येतां घरा,
या विवंचनेमाधिं झोंपहि करिते त्वरा.

एकलीच फिरतां चांदण्यांत शीतल,
मज भरे कांपरे ऐकूं ये चाहुल;
मुखचंद्र दिसावा येतांना गोजिरा,
मी समीप जातां वितळुनि जावा पुरा.

येणार बोलले पौर्णिमाच साधुनी,
हा साक्ष ठेविला हिमकर गगनांगणीं;

पळाविपळ चाललें कातर होई मन,
टळणार काय मग येण्याचा हा दिन ?

मी पडलें राया ! मेलें कढुनी उरीं !
ही मान सांवरी अपुल्या खांद्यावरी ! !

१९३४

## शकुंतलेचें पत्रलेखन–

लिहुं काय सखींनो ! सांगा मज लौकर ?
राजपुरुष तो वैभवशाली
शोभेन तया शेजारीं । मी नोकर.
कशास मज अभिलाषा त्यांची
अंगांत न माझ्या कांहीं । हरहुन्नर.
खरेंच का ग ? केलि मागणी ?
कधिं फुटलेला मुसळाला । नच अंकुर.
जातांना मज हंसुनि पाहिलें
मम चित्त गोंधळुनि गेलें । घटकाभर.
लिहितें त्यांना ' आल्यापासुन
पोटांत न पाणी गेलें । शिंपीभर.
रात्रिमागुनि रात जागतें
तिळतीळ तुटे प्रेमानें । मम अंतर,

मुरळ पाडुनी चित्त चोरिलें
आज फसवुनि मजला केलें । चिंतातुर.
दासी चरणांची ही अपुल्या
विसरलां कसे हो हिजला । या उप्पर ?’
नाथचि अथवा प्रभू तयांना
म्हणुं काय प्रथम मी सांगा । मज लौकर ?

---

## दारांत उभी —

दारांत उभी राहुनि ओठंगुनि बाले !
दावी नच आतां मज हे मोहक चाळे.
वाहून टिपें खालतिं नेत्रांतुनि येतीं;
काढीत उभी तूं पदरानें पुसुनी तीं.
बोलावुनि न्याया घरच्या त्या किति दासी,
येती नच कांहींच मुळीं बोलशि त्यांसी.
पेयें मधु खाद्यें सगळीं आणुनि देती
चाखून जराशीं करिशी बाजुस कां ती ?
कोणीच तुला रंजविते गाउनि गीतें;
कोणीच सुमें मुक्तकचीं खोंवुनि देते.
सोडून कधीं उंबरठा तूं नच जातां
शृंगार करी म्लान न केवींच विधाता !

स्वच्छ प्रत
सं. काव्य नं. १११८
ता. ......


सोडून दिला तूं तव हातांतिल दोरा
कां देशि अतां शीण उगा सुन्न शरीरा ?
संसार असा हा मम चाले सुरळीत
स्पर्शें नच टाकी वितळोनी नवनीत !
लावून असे हे मम दारावरि डोळे
जिंकी कवळें गे ! नच माझें मन भोळें !
राहून उभी दावुं नको व्यर्थ हुशारी !
होणार नसे हो ! भलता मी अविचारी.
टाळीच तरी या पुढतीं संकटराशी
दारांत उभी राहुं नको यापरी ऐशी !!

---

## गडकऱ्याच्या पोरीचें गाणें.

प्रिया राजसा ! बारगिरा !
ओळख द्या ना ! तरी जरा !
तटाखालुनी दौडत जातां शिरीं लखाके उभा तुरा,
जसा हिरा.
जिंकुनि सारा मुलुख घरा
असे जातसां करुनि त्वरा;
तलवारींच्या खडबडण्यानें गनिम कांपती थराथरा,
शूरवरा.

चंद्र येतसे टेंकाया
उंचेल्या बुरुजावर या;
विरह पोंचतो, असा पाहुनी बेरातींच्या मुशाफरा,
दिगंतरा.
करुनी माझी मनधरणी
स्वप्नामाधिं जागी करुनी;
हळूच खुणवुनि बोलविलि मज सोडुनि अवघ्या नयनातिरां,
तीक्ष्णतरा.
पोपट तुम्ही प्राणप्रिया
झुरते मी तरि ये न दया;
वेड्यावाणी जीव टांगला मैनेनें जोडुनी करां,
खराखुरा.
सोडुनि आंब्याच्या राई
येतें तुमच्या संगें ही;
साखर पेरुनि गेलां, शोभत नाहीं असली भलति तऱ्हा,
मर्दनरां.
मधें भयंकर रुंद खणी
आणि वाहते वैतरणी;
जीव घुटमळे कुडींत माझ्या न्याल कधीं तरि पैलतिरा,
मनोहरा ?

---

# शिलेदार.

" Even bees, the little almsmen of spring-bowers,
Know there is richest juice in poison-flowers "
— John Keats

शिलेदार तो अबलक घोडीवर बसुनी समरीं जाई,
विजयश्रीच्या सुखद घनांतुनि परतुनि चमकत तो येई.
कुठें पाहिली मार्गावरतीं रानवासिनी तन्वंगी,
धुंडाळित ये वनांत तिजला बने पुरा चंगी भंगी.
गळां घालण्या वन्य फुलांच्या तिच्या, गुंफिल्या सुममाळा,
पक्वफळें जांभळें वेंचुनी स्वादुंचा पिकवीच मळा.
कांटेरी कुंपणें तुडवुनी रक्तें घळघळ घोडीचीं
गळती रानोमाळ चहुंकडे, चिन्हें दिसती टापांचीं.
ओढ्याचें भागुनीच प्यावें आकंठचि तें जळ गार
छायेखालीं द्यावा टाकुनि देह शिलेवर भरदार;
आणि करावा शोध हरघडी खुशाल त्या वनबालेचा,
उदासवाणा खिन्न चेहरा झाला भटकुनि जरि त्याचा.

\+ \+ \+

मनरमणी ती त्याची तःिही वगवग रानीं शोध करी,
त्यातें गाउनि गीत शतांनीं रिझवी नाले घांट दरी;
ओंठ कोरडे वनहरणीचे पडले, फिक्कटले गाल,
नूर लोपला नयनांचाही, करपटली कवळी केळ !

गोट पाटल्या, बिल्वर गळले इतकि वाळली तनू तिची,
परी विधीला दया येइना गांठ पडेना दोघांची !

\+ + +

असा एकदां ऐन दुपारीं शिलेदार तो परि लक्षी,
कपारीवरी काय मुलायम पुरी ओळखी हरिणाक्षी.
तडक धांवला हताश असतां मारुनि घोडीला टांच
डोहामधिं निज हंसी पाहुनि, मन त्याचें खाई काच.
चिंब उचलुनी परि पाण्यांतुनि बाहूंच्या घालुनि पाशा,
खोगीरावर टाकुनि नेई कळे न कुठल्या तिज देशा !
“ पानगांवचा शिलेदार मी होतिस का माझी मैना ?
वतनी शेती पल्याड पडली, साहुं नको ही अशि दैना ! ”
लाख मनसुबे केले त्यानें तिच्याविशींचे मनामधीं;
तिला विचारी अलबेला तो शुष्क हांपुनी अर्धीमधीं.
वांकवांकुनी चुंबन घेई, आस न त्याची हो पुरती,
मूर्च्छा सरुनी तिच्या जहालीं नयनांची उघडी पातीं.
आणि बडबडे ‘ शिलेदार तो शूर फांकडा कुठें असे ?
ज्याचें असलें मला लागलें दिसंदिसाचि हें गोड पिसें !
प्राण सोडिला बाहूवरतीं तिनें त्याचिया इतुक्यांत;
शिलेदारही घुसे अखेरिस गर्द निळ्या त्या गहनांत.

# दिवंगत गेहिनीस--

बघ आला गे चंद्रमा वरतिं आकाशीं
सारून दूरवर दाटतमाच्या राशी,
हें क्षीर मुखांतुनि शुभ्र तयाचें पडलें
सांडून चहुंकडे सकल विश्व वघ भरलें.
हा वारा वाहे भरभर भरभर भंवतीं
मधु सौरभ आला बैसुनि त्याच्यावरतीं;
ही वेळ पातली एकांतीं मौजेची
सुख दुःख सांडुनी एकुलत्या सौख्याची;
ये अस्माना सोडोनी, खालतीं
या दूषित अवनीवरतीं, मागुतीं
ह्या तरल तारका येथें, विलसती
चल धांव गडे ! निमिषांत अंबरांतूनी
ये करम रात तरि एक माझिया सदनीं.
हा तुझियास्तव नव विशाल सुंदर इमला
बांधिला; तुझ्या पेलव हस्तांहीं सजला.
ह्या गर्द पसरल्या वल्ली हिरव्यागार,
ज्यां नीर मिळालें तव करिचें भरपूर.
त्या अगणित फुटुनी पुढल्या भागावरतीं
इमल्याच्या आतां नवशोभा आणीती;
हें मंगल तोरण कृत्य कुण्या व्यक्तीचें
पृच्छती तदा मम अश्रु गळति नयनींचे.

तूं विषण्णता मम मनसीं, आणिसी
क्षणिं वेडावुनि प्रीतीनें, सोडिसी
पीडाच निरंतर देशी, ही अशी
पिंजऱ्यांत बसले किलवाणे हे येथें
सारिकादि पक्षी गातां कांहिं न गीतें.
हें उपवन रडुनी व्याकुळ भेसुर दिसतें
एकटें तुझ्याविण हृदय म्हणुनि हळहळतें;
हा कुंद दोहदावीण कसा बघ राही
राहुनी स्वस्थ मनिं वाट तुझी कां पाही ?
ही हैमी विकचें डोकावुनि कां बघती ?
कां जडली त्यांची तुजवर ऐशी भक्ती !
ही निशिगंधाचीं फुलें गोजिरीं सान
बघ शुष्क जाहलीं जीं न विकसलीं पूर्ण !
तूं भेट एक दे त्यांना, एकदां
तीं हंसातिल सारीं प्रेमें, खदखदां
प्रीतींची तुझिया लुटुं दे ! संपदा
गुंतलीस कोठें स्वर्गाच्या गाभारीं
विसरलीस बघतां देवांची कां नगरी ?
कां दिवौकसांना तुवां लाविलें वेड ?
मधुकथा कथाया अशी घातली भीड;
कीं हरिण बालकां तुवां लाविली माया ?
नंदनीं तुझ्याविण निघती तीं न चिराया !

कीं ओठंगुनियां सुरसदनाच्या दारीं ?
थाटांत उतरतां बघसि रवीची स्वारी!
ज्योतीसम येती आत्मे मर्त्य जिवांचे,
कां त्यांच्या दिधलें काम तुला सेवेचें ?
तरि पाहुं नको रागानें, मजकडे
विसरलीस ना तूं मजला, यापुढें
सेवाच तुला इतरांची, आवडे
तव पुण्य खर्चुनी असलेलें गांठीला,
ने त्वरित मज सखे ! सवेंच राहायाला ! !

१९२८

---

( शृंगारसाज नामक काव्यांतील कांहीं उतारे )

१

तुज स्पर्शचि करतां दचकुनि बघशी वरी,
कर काढुनि अपुला घेशी अलगे दुरी;
मृदु मांसल बाहूंवरी पदर ओढुनी,
बघतेस गडे ! तूं मनिंच्या मनिं लाजुनी;
हें लाजलाजणें कोठवरी चालणें ?
नच अधर झांकिले जोंवर मी चुंबनें !

२

मानसांत हंसी जेंवि दिसे पोहतां,
तूं पडून तेवीं चटईवर लोळतां;

फेंकुनीच छातीवरलें धरलें बुक,
लव लाजुन बघतां मज, मारिशि बैठक.
हा नको एवढा दावुं गडे ! आदर,
हा प्राण तुझा तव प्रेमाला आतुर.

३

स्वैंपाकासाठीं पांघरुनि लक्तरें,
तूं घरांत फिरशी, आहे जारि हें खरें;
तरि नीटनेटकी लेउनि इरकल जरा,
मज खूष कराया निवडिशि मोहक तऱ्हा.
ही तुला सफेती गोऱ्या तोंडावरी,
धवलांगि ! शोभुन काय दिसे ग तरी ?

४

लुगड्यास खूपशा उंच निऱ्या काढुनी,
हे मदालसे ! दाविशि मंद चालुनी,
बेडौल चालतां बदकीपरि मजपुढें,
कां पदर गळोनी गुच्छांवरुनी पडे ?
किति खूप हांससी कारण नसतां उगा,
बहु लाल होइ तों गालाचा मउ फुगा !

५

घमघमाट सुटला आजि कसला हा असा ?
आणिलास भरुनी कीं प्रीतीचा पसा ?

तव अलक नरम हे किनखापाचे परी,
किति वेळ फिरवुं मी हात असा त्यांवरी !
अनिमीष लावितां तुझ्याकडे लोचनें,
मज चाळे तव हे वेडावति मोहने !

६

तुज विवस्त्रशी एकटी उभी पाहुनी,
आलिंगुनि तुजला धरतिल तव मैत्रिणी;
तव सौंदर्यांच्या कैफानें झिंगुनी,
चिंततील क्षणभर पुरुष व्हावया मनीं.
मग बिलगुन बसतां अशा तुला मंजिरी !
दुखविणार नच कां हुरहुर मज अंतरीं ?

७

तव ऊर किती हा गार हिमासारखा !
राहुं का ठेउनी त्यावर मी मस्तका ?
वर लखलखणाऱ्या अचल तारकेकडे,
लावुनी नजर तूं निश्चल राही गडे !
विसरुं ये जगाच्या क्षण साऱ्या बंधनां,
आनंद आपणां मिळे कसा त्या विना ?

# गुंफलेली माळ—

गुंफुनि माळ सखे ! घालुं मी कंठीं कवणाच्या ?
अपुरी ठेवूं का ? नाथ नच म्हणुनी हृदयाचा;
शुभ्र किती बाई फुलें हीं पहा ! वहरलेलीं;
भृंगांची भंवतीं चालली तळमळ वर खालीं-
रमणकंठस्पर्शा जाहलीं अति आतुर कां हीं ?
करजालीं अवघें एकही ठरत मुळीं नाहीं-
खालीं बघ सखये ! किति मधु मरंद हा पडला;
पसरुनियां भंवतीं चहुंकडे सुगंध दरवळला-
सोडुन देऊं का ? समोरी येतां क्रीडाया;
नको नको पापी- जनांची दृष्टचि बाधाया-
परी विरहदाहें माझिया होतां तीं कोळ;
युवतिप्रेम किती विषारी वदेल मधु वेल !
जा, जा, भृंगानो ! सख्याला सांगा जाउनियां;
सुममाला अवघी चालली रुसत रुसत वार्या-
माले ! मजवरतीं रुष्ट तूं झालिस कां बाई ?
शृंगाराया ही किती तुज केली मी घाई !
पवना वेगानें जाचि पतिहृदयद्वाराशीं;
मंचाकिं माला ही सांग रे पडली स्फुंदतशी-
थांबा, भृंगानो ! पवना ! थांबचि तूं आतां;
आला हृदयेश करूं मग कसली मी चिंता !

# सूर्याजीचा इषारा--

शर्थ करा अपुली आतां बसवुनी दरारा,
चिडूनीच तुडवा पायीं पेटला निखारा;
*विडा सयशाचा उचला जरब लावुनीयां,*
राजरोस लावा यवनां पडायास पायां.
डरूनीच जातां कां हो? तुम्ही वाघबच्चे,
भक्षिलेंत शेळीचें कां नसे मांस कच्चें?
खुळखुळीत भरल्या तुम्ही बांगड्या करीं का?
फिरा असे चवताळूनी गनीमांस ठोका.
जरी लाख भुंकत आले श्वान दिल्लिशाचे;
तरी खास जातिल वाहुन पाट शोणिताचे.
पाहुनियां झाली पुरती रिपूंचीच राळ;
चळचळांच कांपत कर्दन डळमळेल काळ;
भोंवतींच समशेरींना उभ्या करा नंग्या;
पहा! भ्याड पळतिल मागें टाकुनियां लुंग्या.
करा रुंदशा छातींचा अवाढव्य कोट;
मरा वाच भारी अगदीं खावुनियां या ओंठ.
मर्द मावळांतील तुम्ही भले सराईत;
भितां काय? जेविं उजेडा भितें दिवाभीत;
दूरदूर नेउनि रोंवा आपुलेच झेंडे!
दूरदूर मग शौर्याचे वाहुं देत लेंढे!!

# वृद्धभोजनभैरव

( एका लाडूलंबोदरानें एका मेजवानीच्या प्रसंगीं केवळ चहावर उपजीविका करणाऱ्या आधुनिक मिताहारी तरुणांस केलेला उपदेश. )

" कां उठतां? खालीं बसा तरुण मंडळी !
घ्या ! लाडू; खा ! चकल्या; कां लाजतां असे या स्थळीं ?
हें खाद्य खरोखर असे तुम्हां योग्य कीं
मी खोड जाहलों जीर्ण ! मज पक्कान्नें पारखीं.
मी शिरा, कधीं श्रीखंड असें खातसे,
मम पडले दांतचि सारे, मज चर्वणशक्तिहि नसे.
मारिलीं बक्षिसें तरुणपणीं पंक्तित,
तो काळ सुखाचा गेला ये वृद्धपणा सांप्रत.
तनु तरी कशी ही दिसे स्थूल मांसल,
आभारी बासुंदीचा दिधलेंच तिनें हें बल.
तुम्हि पर्द पाहतां काय? घ्याच तरी पुऱ्या;
कां फुलें टाकुनि ऐशीं वेचितसां ह्या गोंवऱ्या ?
मी झालों पिकलें पान हौस आपुली,
कीं सानंदें पाहावीं जेवतां तरुण सानुलीं.
नव खाद्यसरोवरिं उभे लव्हाळे तुम्ही,
घ्या आशिर्वादाचि माझा ' पडणार न कांहीं कमी '.
खा ! खूप; वाढवा उदर, शौर्य दाखवा !
डोळ्यांनीं या पाहूं दे ! मज खाद्याच्या उत्सवा.

मम स्मारक मेल्यावरतिं कुणी बांधवा,
नांवेंच मुलांची ठेवा जिल्बी, मोदक वा खवा;
पारि एक विनवणी असे तरुण मंडळी !
मरतां मम तोंडीं टाका बुंदीची एकच कळी ! ! "

---

## कॉलेजांतील मुलींचें गाणें

टांगा करूं या,
बग्गी करूं या;
साऱ्या जणी कॉलेजाला चला जाऊं या.
घे ग ! थोडी पावडर,
फणी ओढ केंसावर;
नीटनेटक्याच कशा चला वागूं या.
सभा होती मंडळांच्या
किती तरी, कॉलेजाच्या;
उपस्थित राहूनीयां, शोभा आणूं या.
आम्हांला ग ! वगळीतां
बाकें पडति ओस सदा;
गतप्राण होई वक्ता, चला जाऊं या.
नसूं हजर पाहूनीयां,
सारा वर्ग उठे खाया;
प्रोफेसरा धीर द्याया तरी जाऊं या.

जेथें आमुचीच गर्दी
तेथें जागा नुरे कधीं;
स्वयंसेवकांची पुरी त्रेधा उडवुं या.
कधीं मुलांतूनी आले
कागदाचे बाण, भाले;
मुकाट्यानें अंगावरी चला साहुं या.
वर्गणी न मुळीं देतां,
संमेलना येई जातां;
लाळघोट्या चिटणीसां चला फसवुं या.
फोटोमध्यें आम्ही नाहीं;
एवढेंच पुरे बाई!
एखादीच प्रत कशी खपते पाहूं या.
आणि भोंदू संपादका,
नच कधीं देऊं लेखा;
आंबटतोंड्याची खाशी ऐट जिरवुं या.

# कविसंमेलन

होत संमेलन जसें जंबुकांचें,
होत संमेलन जसें नापितांचें;
तसें भरलें तें कुठेंसें कवींचें,
ताल ऐकाया येति गायनाचे.
कुणी चाकाच्या रेंकण्यापरींच,
कुणी वृद्धाच्या खेंसण्यापरीच;
रागदारी गाउनी मृदु कठोर,
रंजनाचें चालवी काम घोर.
बसे बाजूला स्त्रियांचाच ताफा,
आणि पुरुषांच्या चालतीच गप्पा;
त्यांत सनईचा कवीचाच सूर,
जसें झोंपेमाधिं होय ढारढूर.
कुणी गंडेऱ्या कुणी रेवड्याही,
स्वागतार्थी कविवरी फेंकतीही;
कवी लीलेनें त्याच भक्षुनियां,
'धन्य झालों मी' वदे हांसुनीयां.
त्यास नलगे मग तानसेन गोळी,
अचुक मात्रा सुतशेखरी मिळाली;
आणि कविची मग चढलि गोड तार,
कवि बापाला कुणाच्या भिणार?

# माझी सखी

( ही कविता माझ्या आवडत्या रॉली सायकलीला उद्देशून गायिलेली आहे. )

जिन्यावरी चढतांना दमतसे फार; अहो !
उचलीतां हीला मीही दमे अनिवार.
सडकेला जाणाऱ्याशीं बोले अशी गोड; अहो !
आजाऱ्याला तापामधीं मुसंबीची फोड !
नट्टा, पट्टा नको वस्त्रें नको मौल्यवान्; अहो !
रावे थंडीवाऱ्यामधीं अशी बेगुमान.
युरोपीय धनवानें केलें कन्यादान; अहो !
माझ्यासाठीं सोडोनीयां आली जन्मस्थान.
मानवतें कुठलेंही हिला हवामान; अहो !
तोंडावरी दिसे पहा ! कसें समाधान.
लांडी साडी न देतांही सुखी किती नार; अहो !
लाथाडिली कशी जरी हूं चूं नाहीं फार !
शिव्यांचाच स्त्री तुमची करी भडिमार; अहो !
माझी रॉली होत नाहीं कधीं तालेवार !

# बकुलराय—

( या पद्यांत कोंदट खोलींत राहाणाऱ्या कॉलेजांतील गरीब विद्यार्थ्यांची करुण स्थिति वर्णन केलेली आहे. )

गणितांत गुंतला बकुलराय । वरचेवर घेत चहाचें पेय;
समई पुढतीं जळुनि जाय । कडू तेलाचीच सर्वदा.
खूप हालवी मठ्ठ डोकें । डोक्यासी देई खूप बुके,
कपाळास येती अनंत पोंकें । वर्णु देना ती कशी?
क्यालक्युलस् अन् घट्ट भूमिती । त्यास अगदीं त्रास देती;
तोंच घाली झडप पंक्ती । पंतगांची चहूंकडे.
सूर्य झांकावाच जलदांनीं । देशभक्तांस लोकांनीं;
पर्जन्यीं रस्ताच छत्र्यांनीं । तेविं रायास झांकिला.
काळोख पसरे निमिषांत । क्रुद्धराया क्षणार्धांत,
बळ अंगीं चढलें प्रभूत । म्हणे मारीन तुम्हांस पैं.
पराजय ठावा न रायासी । गत झाली आतां कैशी !
विमा घेतला आयुष्यीं । मरण कैंवी तयास ये.
डिव्हायडरें, टिस्क्वेअर्, । परिक्षेंत चोरले पेपर्,
तसेच घेऊन होल्डर । राया सज्ज ठाकला.
आधुनिक आयुधें अपार । सांगतां तयांचा बडिवार,
कवीस होवून बेजार । मरण येईल पैं.
पिसवा चावे कडकडून । शत योजनें करी उड्डाण,
आणखी विमानांतून । चिलटें शंख फुंकिती.

संग्राम झाला घनघोर । राया झाला जर्जर,
खोलींत मोठें मार्जार । म्यांव दावी करुनियां.
दहा सहस्र मारिले ढेंकूण । माजलें मोठें कंदन,
रक्तपाट चालले वाहून । सागरास मिळती जाउनी.
ओंठ खाऊन त्वेषानें । पुष्ट ढेंकूण रायानें,
पदतलीं चिरडून जोरानें । यमसदना धाडिला.
फटफटीचा जसा नादू । भूकंपाचा जसा शब्दू,
फटक्यांचाच आघातू । तेंवि आवाज होय पैं.
प्राण घ्यावया संकटीं । मिठी घातली डांसकंठीं,
परस्परां पडतां मिठी । डांस तोंडींच अडकला.
भिंतीवरी चित्रें देवांचीं । रविवर्म्यानें काढिलीं साचीं,
कृत्यें पाहून रायाचीं । खदखदां हांसतीं.
मूर्च्छा येऊन रायासी । राया पडला धरणीसी,
लढतां लढतां स्थिती ऐशी । झाली त्याची तेधवां.

( बकुलरायाची इस्पितळांतील स्थिति. )

तडफड बहु करतो राय रुग्णालयांत,
फडफड भरुनी ये ताप डेंगू तशांत;
बडबड करि तोंडीं डांस, ढेंकूण, पिस्वा;
मरत झडत देवा! नष्ट होतील केव्हां ?

इति मत्कुणार्पणमस्तु.

# प्र ति मा

(खंड काव्य)

संग्राम झाला घनघोर । राया झाला जर्जर,
खोलींत मोठें मार्जार । म्यांव दावी करुनियां.
दहा सहस्र मारिले ढेंकूण । माजलें मोठें कंदन,
रक्तपाट चालले वाहून । सागरास मिळती जाउनी.
ओंठ खाऊन त्वेषानें । पुष्ट ढेंकूण रायानें,
पदतलीं चिरडून जोरानें । यमसदना धाडिला.
फटफटीचा जसा नादू । भूकंपाचा जसा शब्दू,
फटक्यांचाच आघातू । तेंवि आवाज होय पैं.
प्राण घ्यावया संकटीं । मिठी घातली डांसकंठीं,
परस्परां पडतां मिठी । डांस तोंडींच अडकला.
भिंतीवरी चित्रें देवांचीं । रविवर्म्यानें काढिलीं साचीं,
कृत्यें पाहून रायाचीं । खदखदां हांसतीं.
मूर्च्छा येऊन रायासी । राया पडला धरणीसी,
लढतां लढतां स्थिती ऐशी । झाली त्याची तेधवां.

( बकुलरायाची इस्पितळांतील स्थिति. )

तडफड बहू करतो राय रुग्णालयांत,
फडफड भरुनी ये ताप डेंगू तशांत;
बडबड करि तोंडीं डांस, ढेंकूण, पिस्वा;
मरत झडत देवा! नष्ट होतील केंव्हां ?

इति मत्कुणार्पणमस्तु.

# प्रतिमा

(खंडकाव्य)

खंडकाव्यांतील पात्रें :—

गुंजारव :—वृद्ध चंचलाधिपति.

प्रतिमा :—गुंजारव राजाची कन्या.

कदंब :—राजाचा दुष्ट प्रधान.

रंजन :—राजाच्या मंत्र्याचा मुलगा व प्रतिमेचा प्रियकर.

(शिवाय दासी व सेवक मंडळी.)

काव्य नं. ११९८
ठाणे.

# प्रतिमा

## ( खंडकाव्य )

——[O]——

## सर १ ला

( **गुंजारव** नांवाचा ऐश्वर्यवान् राजा आपल्या वृद्धावस्थेंत चंचलेसारख्या रमणीय नगरींत राज्य करीत असतो. त्याला **प्रतिमा** नांवाची लावण्यवती व यौवनसंपन्न अशी कन्या असते. परंतु अनुरूप असे बरेच प्रतापी राजकुमार तिला वर म्हणून आले असतां देखील ती विवाहाला संमति कां देत नाहीं हें सार्‍यांनाच कोडें असतें. **रंजन** नांवाच्या मंत्र्याच्या रूपवान् पुत्रावर ती आसक्त असते. त्याच्या गाण्यावर लुब्ध होऊन आपला गायनवादनाचा शिक्षक म्हणून ती त्याची निवड करते. इतकें होतें न होतें तोंच राजाचा मुख्य प्रधान **कदंब** त्यांच्या प्रेमपाशांत विघ्न कालवितो. )

अश्रु. १

हाताचा हलु भुंवयावरतीं ओढुनि तळवा धरा,
चलाच रसिका ! येथें पुढतीं गजबजलेली धरा.
पाहुं नका हो ! मागें पुढतीं, आतुर जीच्यास्तव,
तीच चंचला नगरी, जेथें राजा गुंजारव.
कन्या त्याची एकुलती; जणुं शुक्राची चांदणी,
म्हणती तिजला प्रतिमा; निरलस राजस मृगलोचनी.
कोमलतेची भूवरची कीं मूर्तिमती देवता,
अर्पण केलें यौवन प्रांतीं पद, तिज ये चारुता.
तिची करुण ही कथा सांगणें माझ्यावर सोंपलें;
आधींपासुन काळिज चळचळ कंपूं मम लागलें.

अश्रु. २

पहा! मधुन ही नदी शृंखला शोभिवंत वाहते,
घुंघुरवाळा पायीं बांधुन वनदेवी नाचते.
सरी-ठुशीवर वेल काढिले मिन्याचेच कीं तसे,
पात्रांतुनियां उदक वाहतां नागमोडिनें दिसे.
तीरावरतीं तिचिया वसली हुमदाराचि चंचला,
मेघांच्या कीं अग्रावरतीं चपला चिन्मंगला.
किती झळकती कनकाचे हे कळस उभे भोंवतीं,
बहू मंदिरें शिल्पकलेचे नमुने नव दाविती.
वासंतिक शोभेला मोहुनि येती जन दूरचे,
ऐकवुनीयां जाति नृपाळा गोड दुन्याचीं वचें.

अश्रु. ३

वैभवशाली राजपुरुष बहु इथली सालस प्रजा;
दूरदूरचे कलावंत किति इथें मारिती मजा!
तऱ्हेतऱ्हेच्या उपभोगामधिं रतले इथले जन,
चंचलेशही हार्दिक अपुलें अर्पी तन मन धन.
विलासभूमी सरस्वतीची वदुन जाति पाहुणे,
किती मोहती पाहुन इथलीं, महाल केलींवनें.
सुनर्म होउनि श्रीही सोडुनि धनवंता पातली;
कोणी म्हणती याच नृपांच्या अर्धासनिं बैसली,
कशी शैलजा सोडुन राहिल दूरवरी सागरा?
कैशी चपला खालीं येइल सोडुन नीलांबरा?

अश्रु. ४

लावण्यवती लेक नृपाची नक्षत्रा लाजवी;
गातां कवनें तिच्यावरोनी कवींस ये थोरवी.
खसखसकांठीं शालू नेसुनि प्रभातींच भर्जरी;
दौडत जाई वायूसंगें अबलख घोडीवरी.
सहजचि करतां रपेट, फटका नगरींतें एकदां,
चपळ वारुतें वठणीला ती आणुनि जिरवी मदा.
काळया मेघां मधुन दिसावी चंद्राची कोर!
तसेंच चमके भुंवयाखालीं नयनांतील नीर!
पांवा घुमतो असा घुमावा कंठांतुन सूर;
शीळ सोडुनी वारा मौनचि धरि वारंवार!

अश्रु. ५

चैन पडेना कन्या उपवर झाल्यापासुन नृपा,
पार पडावें विवंचनेंतुनि म्हणुनि चालवी जपा.
होता थकला तारुण्याच्या बागडुनीयां तृणीं;
वार्धक्याची आंच लागतां शिजे तयाची कणी.
तशीतशी त्या जाळुं लागली अतोनात काळजी,
चढविन केव्हां होउन गेलें लग्नपताका ध्वजीं.
कन्येच्या त्या रूपसंपदेसही बघुनियां किती,
आसपासचे कुमार गेले राजाचे, सांगती!
अजुनि कथितसे प्रताप त्यांचे, जिवलग दासी तिची,
येणाऱ्या, जाणाऱ्या, पुढतीं आश्चर्यें राह्यचीं..

अश्रु. ६

धवलपुरीचा राणा—ज्याच्या पुच्छ लागतां करीं,
भिऊन लागे करावयातें चीं चीं मोठा करी;
पणास करुनी आला ‘रमणी मिळविन प्रतिमा मला’,
गेला मागें हिरमुसला नच पुनरुपि तो परतला.
राजगडाच्या सरदाराचा गोंडस मुलगा तसा,
गुलाब ओतुन उमटविला जणुं वदनावरतीं ठसा;
आला घेउन प्रधान, मंत्री, हिमकर गगनीं जसा;
खूप दाविला दिमाख, फांसा नाहीं पडला कसा!
ओलांडुनियां वारूळापरि हिमशिखरें, डोंगर;
चाऱ्हि दिशांनीं प्रतिमेसाठीं येउनि गेले वर.

अश्रु. ७

परी कळेना काय बिंग तें स्वयंवराचें कुणा;
मनधरणी कां राजाच्या त्या लेकीची होइना!
कोणी म्हणती जिंकिल तिजला जो अश्वारोहणीं,
केली ऐशी तिनें प्रतिज्ञा ‘करीन त्याला धनी’;
ज्याच्या तोंडावरी परारले बहु जखमांचे वण,
आण तियेची तया वराया वदती सेवकजन.
इकडुनि तिकडे हवेंत असलीं लाखवार बोलणीं;
घडलें परि जें कोणाच्याही नव्हतें ध्यानीं मनीं.
हाय! हाय! हो! ज्याच्यासाठीं दिली तिनें आहुती,
कथा तयाची अजून तिथले जन सारे सांगती.

## अश्रु. ८

नृपमंत्र्यानें अपुल्या पुत्रा जाणुनि त्याची कला,
बढतीसाठीं हिकमत करुनी दरबारीं ठेविला.
वाद्यचतुर अति अशी मिळविली ख्याति तयें चहुंकडे,
नृपकन्येला गान तयाचें ऐकुनि विभ्रम पडे.
बीन, बांसरी, अलगुज—वाद्यें त्याच्या करिंचा मळ,
घरांत पडला सांजींपार्दीं बहु वाद्यांचा तळ.
असे देखणा जसा वसंतीं फुलला वटमोगरा,
दृष्टि तयाची गोड जरि मधुमशा फांकितो हिरा.
होत तयाची नृपकन्येच्या महालांत योजना,
हृदयीं त्याच्या होउं लागल्या प्रेमाच्या वेदना!

## अश्रु. ९

मुष्किल झाल एकांमेकांवांचुनियां राहणें,
खळबळ हृदयीं सदा तयांच्या, तीव्र जाहलें जिणें.
कलिकेपरि सुकुमार जशी ती प्रतिमा लज्जावती,
रंजन अगदीं मूक, न त्याच्या मुग्धपणाला मिती!
कैसें वेड्या जीवांनीं या प्रेम न केलें कळे!
एकांतामधिं कंठित होतीं कैशीं नकळे पळें!!
गमे रंजना जाउं नये कीं महाल तो सोडुनी,
सोबत त्यातें तिनें करावी दिंडी ओलांडुनी.
असती जरि तीं दूर वेगळीं अगदीं परक्यापरी.
निद्रेमाजीं एके ठायीं श्वास चालती तरी!

अश्रु. १०

प्रधान पदरीं राजाच्या त्या होता मर्जीतला,
प्रिय साऱ्यांहुनि प्रजामंडळीं त्याला तो एकला.
खासगींतल्या तोच करितसे कामाची आंखणी,
चाहुल त्यांच्या प्रेमाची ये त्यातें तशि लागुनी;
उभारलेलें घर जमिनीला पाडिन केव्हां असें,
त्याला झालें; भ्रमूं लागलें, मस्तक त्याचें तसें.
दुर्बुद्धीच्या, दुष्टमतीच्या अथांगशा सागरा!
सुचलें तुजला, कशी करविली स्वर्गाची तूं धरा!!
स्वर्गंगेची, स्वरूपाची, जिच्या हृदीं मधुरता,
कैशी धजली वार करूं तिज तीक्ष्ण तुझी असिलता?

# सर २ रा.

—*—

[ एके समयीं शिकवणीच्या वेळीं प्रतिमेच्या हातांतील वीणा रंजनाच्या वक्षःस्थलावर आदळते व अशा रीतीनें लज्जेच्या औपचारिक विधीनंतर प्रेमाची नांदी होते. कालान्तरानें शीतकालाचा कडका चालू असतांही दासीच्या मध्यस्थीनें प्रतिमा रंजनास राजवाड्यानजीकच असलेल्या रानांत अपरात्रीं स्वतःस भेटण्यास बोलाविते; तेथें तिचें प्रेम त्याला घातक होणार अशी तो तिला ग्वाही देतो. ]

अश्रु. १

तिचीं एकदां बोटें अविरत तारांवर खेळतां,
मुखीं तयाच्या लवलज्जेनें चपापली देखतां;
तोल जाउनी पडली वीणा त्याच्या वक्षःस्थलीं,
प्रमुदित होउनि अलगत त्यानें हातांमधिं झेलली.
नकळत होतें हवें तेंच तें घडलें पडुनि मिठी;
लाज पघळली नयनांतुनियां, सरली दुर गोमटी.
पहा ! पहा ! रंजना नको रे ! लाजुं अतां दचकुनी,
लवली अगदीं मान तिची, तिज घे पुरती पाहुनी.
ठाउक नसती काय तुला रे ! ह्या प्रेमाच्या खुणा ?
होइल सारा यांवांचुनियां गोल जगाचा सुना !

अश्रु. २

चीज गायिली—

( एका प्रातःकाळीं निद्रावश प्रतिभेस रंजनानें गायिलेलें गाणें. )

( गज़ल )

राजकन्ये ! ऊठ वेगें बैस या वाळूवरी,
माणकांचे हार घाली, लाजरी ही शर्वरी;
बालसूर्याचा हा होतां स्पर्श किंचित्, ही उषा—
लाजरी, लाली कपोलीं; लोपली आतां निशा.
ह्या महालीं, त्या महालीं तेजगंगा धांवुनी,
देवलोकीं नेत सारें द्रव्य खांदीं वाहुनी.
दिव्य कन्या दशदिशा ह्या लेउनी पीतांबराला,
मैत्रिणी तूझ्या उभ्या ह्या सोडुनी नीळांबराला.
—गोड तियेश उत्साहें करपुनी;
फंस तयांच्या सळसळुनियां ये प्रेमालागुनी. १२०

अश्रु. ३

परी दिसावे दर्पणावरी थिजलेले हिमकण;
बोट लागतां जावी त्यांची सुंदरता भंगुन;
किंवा कोयळ पालवीतुनि जपुनि सोडतां शर,
कंठ कांपुनी यावी खालीं गातांना सुस्वर;
वा डोलामाधिं नौका असतां पोहत पाण्यावर,
क्षणांत जावी डुबून खाशीं डागळतां अंबर;
उभी राहतां बोहल्यावरी सुभगेची गळसरी—
क्षणीं पडावी तुटुन, दिसावी कमनशिबाची सुरी !
नकळत यापरि आला त्यांचा घातवार चालुनी;
लवभर शंका चढल्या प्रेमा यावी कशि कोठुनी ! १२०

अश्रु.४

दिली तिनें दासीस काढुनी गळ्यांतली बिलगिरी,
घडवुन त्यांची आगा[illegible] पहांटे दुरी;
प्रसन्न हृदयें प्रतिमा निघुनी [illegible]तुनी,
समोंवतालीं गर्द पसरल्या रानीं ये चालुनी.
शीतानें तर कहर उडविला ! गारठुनीयां तरू,
सान रोपटीं काकडुनीयां होतिं लागलीं झुरूं;
सोडुनि अपुल्या धांवपळीला ओढ्यांचेंही जल,
लोहाळयांचा आश्रय करुनी वाहे बहु निश्चल.
लोळत विश्वावरी चांदणें चंद्राचें निस्तुळ,
गमे होत कीं शीत बिलगुनी हळूच निद्राकुल.

अश्रु५

गारठली ती तिची चालतां नवनीतासम तनु,
हिमासारखी कठिण जाहली नाजुक उघडी हनु;
कठोरता बहु शिशिराची तशि जगाचीहि समजुनी,
आज तिला ये, महालांतुनि येतां अशि चोरुनि.
परी ऊब हृदयांत धरूनी प्रेमाची यापरी,
तिनें लाविली वातावरणा हार खावया पुरी.
पानांवरतीं झाडांच्याही दंवबिंदू गोठुनी,
वाफा निघती हवेंत, करिते श्वसन गमे मेदिनी;
बसली वाटेकडे पाहुनी तिथेंच शीळेवर,
गोड रानवी कंपुनी मना हर्ष देइ निर्भर.

[ प्रतिमेनें गायिलेलें मार्गप्रतीक्षेचें गाणें. ]

( चाल—रजनीनाथ )

मम हृदयाच्या रे ! शिणगारा;
ये अधरींची चाखी मदिरा ॥ धृ. ॥

बहर बहरला नवनवतीला,
ओसंडुनियां कधिंच चालला,
भेटायाला पहिला वहिला,
कधिं मम येशिल जादूगारा ?

दाट रान या वेली भंवती,
पुष्पवती ह्या श्यामा युवती,
एकामेकां कवटाळीती;
सुचविती अखिल विश्वविहारा.

कांटे धोंडे पायां रुतले,
महालास मी माझ्या त्यजिलें,
तुझ्यासाठीं रे ! स्वजना आलें—
बघ त्यजुनीयां ही परभारा.

रजनीच्या बघ केशकलापीं,
वरतिं चंद्रमा गेला झोंपी,
ओढा थकुनी अंतर कांपी,
नच जीवाला त्याच्या थारा.

अश्रु. ८

चांद रुपेरी नभांत तळपे खळखळ खालीं झरा,
पानांपानांवरी तरूंच्या चमके पांडुर चुरा.
निबिडरान हें भयकर डोंगर भंवती काळ्या शिळा,
सुस्वर गाणें गाताचि होती तेथें ही कोकिळा;
अनुपम नटुनी सुमें लतांवर सजली बहु उपवनें,
तिथें लागली अचूक अगदीं सृष्टीचीं ईक्षणें.
क्षणीं लोपते क्षणीं चमकते तमोवितानावरी,
खद्योतावलि इकडुनि तिकडे ती उडुरानांपरी.
लाजलाजती तरुकुक्षीमधिं प्रणयधुंद वल्लरी,
तेही हांसती सर्वेचि अपुले सळसळुनी त्यापरी.

अश्रु. ९

तिथें पातला अचूक रंजन करुनि मनाचा घडा,
चौंबाजूचा चुकवुनि आला उभा पहारा खडा.
बेरातींच्या घोरत पडल्या गस्ती किति भोंवतीं,
पणास लावुनि जीव निघाला, नव्हती धैर्या मिती.
परि धडधडतें हृदय पाहिलें प्रतिमेनें क्षणभरी,
भीति राहिली मूर्तिमंतशी उभी तिच्या अंतरीं.
केली पृच्छा काय मिळाला त्यातें फटका, दगा;
प्रेमाच्या प्रांतात पसरल्या विघ्नांच्या आपगा.
घाम डंवरला मुखीं पाहुनी, पदरानें झडकरी,
पुसुनि काढिला, मान कलविली त्याच्या वक्षांवरी.

अश्रु. ६-७

[ प्रतिमेनें गायिलेलें मार्गप्रतीक्षेचें गाणें. ]

( चाल—रजनीनाथ )

मम हृदयाच्या रे ! शिणगारा;
ये अधरींची चाखी मदिरा ॥ धृ. ॥

बहर बहरला नवनवतीला,
ओसंडुनियां कधिंच चालला,
भेटायाला पहिला वहिला,
कधिं मम येशिल जादूगारा !

दाट रान या वेली भंवती,
पुष्पवती ह्या श्यामा युवती,
एकामेकां कवटाळीती;
सुचविती अखिल विश्वविहारा.

कांटे धोंडे पायां रुतले,
महालास मी माझ्या त्यजिलें,
तुझ्यासाठीं रे ! स्वजना आलें—
बघ त्यजुनीयां ही परभारा.

रजनीच्या बघ केशकलापीं,
वरतिं चंद्रमा गेला झोंपी,
ओढा थकुनी अंतर कांपी,
नच जीवाला त्याच्या थारा. १७०

अश्रु. ८

चांद रुपेरी नभांत तळपे खळखळ खालीं झरा,
पानांपानांवरी तरूंच्या चमके पांडुर चुरा.
निबिडरान हें भयकर डोंगर भंवती काळ्या शिळा,
सुस्वर गाणें गाताचि होती तेथें ही कोकिळा;
अनुपम नटुनी सुमें लतांवर सजली बहु उपवनें,
तिथें लागली अचूक अगदीं सृष्टीची ईक्षणें.
क्षणीं लोपते क्षणीं चमकते तमोवितानावरी,
खद्योतावलि इकडुनि तिकडे ती उडुरानांपरी.
लाजलाजती तरुकुक्षीमधिं प्रणयधुंद वल्लरी,
तेही हांसती सर्वेचि अपुले सळसळुनी त्यापरी.

अश्रु. ९

तिथें पातला अचूक रंजन करुनि मनाचा धडा,
चौंबाजूचा चुकवुनि आला उभा पहारा खडा.
बेरातींच्या घोरत पडल्या गस्ती किति भोंवतीं,
पणास लावुनि जीव निघाला, नव्हती धैर्या मिती.
परि धडधडतें हृदय पाहिलें प्रतिमेनें क्षणभरी,
भीति राहिली मूर्तिमंतशी उभी तिच्या अंतरीं.
केली पृच्छा काय मिळाला त्यातें फटका, दगा;
प्रेमाच्या प्रांतात पसरल्या विघ्नांच्या आपगा.
घाम डंवरला मुखीं पाहुनी, पदरानें झडकरी,
पुसुनि काढिला, मान कलविली त्याच्या वक्षांवरी.

ती नृपकन्या ह्मणे " राजसा ! दासी माझी तिला--
सांगुनि माझा गोड तुह्मांला, निरोप मी धाडिला;
रोज ठरविलें सांगुन ठाकूं दील करुनियां खुला,
तुमच्या चरणीं तुमच्या भजनीं जीव पुरा वाहिला.
रोज राहिलें चळून तुमच्या निमग्न पारायणीं;
नजर विखारी तुमची पुरती टाकी मज मारुनी.
आज भेटलें भीड सोडुनी भीत भीत प्रियकरा !
लज्जा घेउन पदरीं, टाका प्रेमाची शर्करा. "
" तूं नृपकन्या, पामर मी मज जाळ्यामधिं ओढुनी,
घेशी पुरतें, लागे भयकर अधिकाधिक ओढणी.

# सर ३ रा.

—०—

[ रानांतील अपरात्रींच्या भेटीनंतर राजवाड्यानजिकच्या उपवनांत त्यांच्या भेटी गांठी होऊं लागतात. परंतु ह्या सार्‍यांवर विरजण पडणार आहे अशी अंधुकही कल्पना त्यांना येत नाहीं. कदंब अधून मधून मृगयेच्या मिषानें पहाटेला राजमंदिरांत येत असतो; व अशाच एका प्रसंगीं प्रतिमा रंजनांचें कंठालिंगन घेत आहे असें दाखवून तो राजाचें मन कलुषित करतो; त्याला कारण कदंबाच्या कपटपटु मुलीचा रंजनानें अव्हेर केलेला असतो हें होय. व तें शल्य कदंबाचे मनांत सलत असतें. एका नगरशेटाच्या मुलीच्या खुनानें द्रव्य मिळवून कदंबानें आपला दुष्टपणा परमावधीस पोंचविलेला असतो. ]

अश्रु. १-२

( रंजनानें प्रतिमेकडून मागितलेलें आश्वासन. )

" जीवाच्या करूनी राना,
दाखियला एक बाणा,
प्रेम करीन या कोणा—
एकावरी.
भेदभाव मानीला ना,
ओंवाळिले पंचप्राणा,
प्रेमास्तव आधीं कोणा—
एकावरी.
साहुनी अवहेलना,
पटवुनी दावी जनां,
प्रेम करितें या कोणा—
एकावरी.

प्रेमाचिया परित्राणा,
धांवुनि ये देवराणा;
तुझें प्रेम सारें कोणा—
एकावरी.

करुनी प्रेमपूजना,
सांग त्या जगज्जीवना;
प्रेम केलें तें ह्या कोणा—
एकावरी. २२०

अश्रु.३

" आठवतें कां? गे! स्मरतें कां? लज्जायुत जेधवां,
झालिस तूं बहु, प्रथम विंधिलें तेहां माझ्या जिवा.

त्या घटकेला, त्या समयाला, तुझ्यावरी भाळला,
जीव पुरा हा, उजाड जगतीं हिंडूं बघ लागला.

निद्रा नाहीं, अशन न कांहीं, प्रेमाची लालसा,
तुझ्या लागली एकाचि; माझ्या मुकलों मी माणसां.

प्राण आणुनी नयनीं पाही, होउनि चिंतातुर,
तुझ्याचसाठीं अक्षय जाई, वेडावुनि अंतर.

तुजवर करतां प्रीती होतिल देहाच्या चिंधड्या,
तल्वारींच्या माझ्यावरतीं गमलें पडतिल उड्या!! २३०

अश्रु. ४

लपंडाव मी किती करुनियां बाहेरुनि दाविले,
हृद्‌यकपाटीं चोरुनि गुपचुप चित्र तुझें ठेविलें;
त्या चित्राला चितारण्याला आशेचे कुंचले,
किती लाविले, अनुदिन सखये ! माझ मज ना कळे !
चित्तचकोरी ! नजरचि न्यारी तुझी पाहुनी अशी,
गमलें मजला पाडुनि ध्यावें सुखें एकदां फशीं !
परंतु मिळतां नकार मातें, भय माझ्या मानसा,
घरदारावरि नांगर फिरुनी जाइल माझ्या कसा ! "
प्रेमालापीं असें गुंगुनी जुग्म किती प्रेमळ !
दूर व्हावया सुसिद्ध होतां होई दुःखाकुल !!

अश्रु. ५

प्रेमी जीवां ठाउक नव्हतें जमली खलमंडळी,
भेटूं लागली ह्मणुनि महालाभोंवतालिंच्या स्थळीं.
निशीं, पहाटे, वेळिं फावल्या तशीं लागलीं फिरूं,
अंधारांतुनि चोरुन करती हळूच कुजबुज सुरू.
एकामेकां कितेक चिन्हें प्रेमाचीं अर्पुनी,
त्याच पावलीं खिन्न मनानें जाति रोज परतुनी.
प्रेमाच्या ह्या अशा निरंतर वाढत जाती कला,
नसे शांतता साहस सारें आल्यावांचुन फळा.
तीनसांजच्या दीर्घ वाढतां छाया मिळती जशा,
गंगाजमुना प्रेमाच्या त्या एकरूप ना तशा !

अश्रु. ६

विसरत नव्हता प्राणसखीला स्वप्नींही पळघडी,
प्राणहंस तो; तिज ती त्याची निस्तुल कांचनकुडी.
कल्पवृक्ष तो, तिला आसरा एक तयाची कटि,
ती केवळ तर छाया विलगुन असलेली तळवटिं.
नेत्रींचें तो तिचिया अगदीं जपलेलें अंजन,
त्याच्यावांचुन जगतीं तिजला नव्हतें मनरंजन.
कधीं करावी भुलवाया त्या छेलछबेली तऱ्हा,
शंकित चित्तें भेटायातें यावें करुनी त्वरा.
ऐशीं यापरि ख्यालिखुशालित गडलीं हीं पांखरें;
दुर्दैवाच्या परि हातांतिल अजाणतीं लेकरें !!

अश्रु. ७

प्रेमाचें कळ दावुन मंदिर उठलेलें मंगल,
भुंगा लागुन आंतुन होतें झालेलें पोकळ;
रमली असली भरथाटांतिल अंतराळिं वावडी;
गोता बसतां आली खालीं करुनीयां तांतडी,
झालेली हौसेने सुंदर सोन्याची मांडणी;
तशीच राहे पडून नसतां कोण तिला तो धनी.
नाग घालितो मैलागिरिवर विळखा त्या चंदना;
तसाच बसला चटका प्रेमी जीवांच्या ताधें मना.
होत पूर्ण तें जों न तयांच्या प्रेमाचें वारसें;
तोंच तयाच्या चिन्ह लागलें दिसुं मरणाचें कसें ?

अश्रु. ८

प्रीत रंजनावर प्रतिमेची जडल्याची चाहुल,
कदंबास ये कळून; योजी नाश तयांचा खल.
येउं लागला मृगयामिषेंच अनुदिनिं राजगृहीं;
अंधारांतुन जन्म पावतां अथांग सारी मही.
घटकाभर चाललें काय तें येई हळु हेरुनी,
नृपाळ असतां शयनागारीं निद्रेला विलगुनी.
आणि एकदां असे फिरकतां उद्यानपथांतुनी;
चूर दाविली रंजनाचिया प्रतिमा आलिंगनीं.
" वज्राची शुद्धता, शिस्त तशि पोलादी, तुडवुनी,
प्रतिमा वागे अशी !! रायजी ?" नृपास पुसलें क्षणीं.

अश्रु. ९

टपून बसला होता अगदीं कदंब वडवानल,
मंत्र्याच्या विभवाचें होतें हवें तया काजळ;
दुहिता त्याची तशीच छाया, त्याची भीषण कृती,
नव्हती तिजला ठाउक अगदीं कसली ती संस्कृती.
प्रेम करीना म्हणुनि मारला सरदाराचा सुत,
विषप्रयोगें; परि अपघातें मेला हें जनमत.
होता जाणुन कृती राक्षसी ह्या साऱ्या रंजन,
कंदंबदुहिता जरी तयाला आलेली सांगुन,
उधळुनि दिधली तयें स्वयें ती लग्नाची जुळवणी;
गोष्ट प्रधाना अपमानाची डांचत होती मनीं.

अश्रु. २

"केलें नाहीं कन्येस्तव जें त्रिखंड देवादिकीं,
करितों सारें तुझियाखातर, होशिल ना तूं सुखी?"
कोप वितळला असा पित्याचा खरोखरी पाहुनी.
आशेचे ग्रह तिच्या उगवले किती मनःप्रांगणीं!
"कुंज प्रीतिचा तुझिया दिसतो, अतांच हा तोडुनी,
येथें करुं तुज महाल, कारण चैन न त्यावांचुनी."
राजेशानें असें बोलुनी उभारली संगिन
अशी देखतां; वल्लरींतुनी येइ पुढें रंजन;
उभा राहिला मुक्या मनानें अवनत करुनि शिरा,
म्हणे "असें मी गुन्हेगार, तरि क्षमाच दीना करा."

अश्रु ३

"नराधमा! ही मला लागली होती कुणकुण अशी,
अपकीर्तीचे वहात जातिल वारे ना दशदिशीं?
गालबोट तूं पुरें लाविलें वंशा वटवाघुळा!
प्राण हरण तव करून आतां, शासन करितों तुला.
कुळास माझ्या आग लाविली जन्मुनि चांडाळणी!
कशी घातली अशी वायसें तरी तुला मोहनी!!
तरवारीचा वार करोनी याच तुझ्या प्रियकरा,
माझ्या देखत क्षणीं पाठवी यमाचिया तूं घरा."
करिंची त्यजुनी संगिन प्रतिमा वदे "जीव वांचवा
मम हंसाचा; वार करुनियां स्वर्गीं मज पाठवा."

**अश्रु. ४**

नश्वर सत्ता, नश्वर माया, प्रेमहि तें नश्वर,
प्रतिमेला अजि कळलें नमितां पित्यापुढें निज शिर.
विनवुनि त्यातें भिजवुनि पादद्वयास अश्रूजलें,
येउन बसली शून्य महालीं पीडित चिंतानलें.
पहाऱ्यांतुनी डोळ्यांदेखत नेलेला रंजन,
कुठें ठेविला, गमलें तिज तें यावें तरि पाहुन.
दुःखाच्या खाईंत यापरी प्रीत जगीं वाढते;
चंद्रा पाहुन जसें रंगतें उदधीजळ भोंवतें.
सुखामागुनि दुःख पोसतें-जगताची ही घडी;
प्रेमपथावर उद्वेगाच्या भरलेल्या कावडी.

**अश्रु. ५**

(प्रतिमेच्या छोट्या दासीचें नेहमीचें गावयाचें गाणें.)

(गज्जल)

कशाला घोर हा साचा ?
कशाला घोंट प्रेमाचा ?
जगीं जो दास प्रेमाचा;
तयाला ध्यास मृत्यूचा.
प्रीतिपायीं गेलिं लया मरुनि किती या जगतीं;
कलश रिता परि पुरता प्रीतीचा बुध वदती.
मना हा नाद नाशाचा !

दासी छोटी–तिचा तियेला पहिल्यापासुन लळा;
तिजपुढतीं ती बसून होती रुदन करित ढळढळां.
हमेश तिचिया गाण्यावर त्या जीव तिचा जो खुळा;
अज्ञमनाचें गीत तेंच अजि आणि न जीवन कळा.

अश्रु, ६

बडतर्फीच्या, बेअब्रूच्या त्या दिवसापासुन,
ताकीदीवर विमुक्त होता रंजन बंदींतुन,
कंठुनि विजनीं अज्ञातस्थळीं चार दोन ते दिन,
पित्यास आला भेटायातें, भकास होतें मन.
तयास होतें अधिकारच्युत कधींच केलें नृपें,
प्रधान, मंत्री, सचीव त्याच्या हातांतिल गंजिफें.
देखुन रंजन असा गवसला, कालवलें अंतर;
गोंजारुनियां वदे तयाला—आला बहु गहिंवर.
" हाय ! लाडक्या ! काय करूं मी झाला माझा चुरा,
बोल दुखविलें कुणी तुलाहीं, निष्प्रभ कां चेहरा ?

अश्रु. ७

सर्वस्वाचा होम करूनी झटेन तुझियास्तव,
माग अधिक जें प्रिय तुज जगतीं, कांहीं करि आर्जव;
टाकीन सारी दौलत तुझियावरून ओंवाळुन,
बोल ! बोल ! रे ! चिमण्या राव्या ! जाइन रागावुन;
झपाटलासी कुठें, दृष्ट कां कवणाची लागली,
अशी निमाली वदनावरली लाली कां कोंवळी ? "
स्मशानशांती होति पसरली तधिं मंत्र्याच्या घरीं;
नयनांतुनि आप्तांच्या होत्या चमकत अश्रूझरी.
" पूज्य पिताजी ! अनंत आहें अपराधी आपला,
माया सोडा मजवरची, मज माझा पथ मोकळा. "

अश्रु ८


दो शब्दांमधें पित्यास करुनी सारे हृद्गत खुलें;
प्रणाम करुनी घेई मागें घरांतुनि पावलें.
पायांखालीं वाट आणखी उघडें वर अंबर,
फिरूं लागला रंजन भडकुन त्या नगरीबाहिर.
गिरक्या घाली घार चहुंकडे गगनामधिं एकली,
प्रतिमा तेवीं फिरत महालीं सैरावैरा खुळी.
संध्यासमयीं तिनें जोडुनी हात, अंबराकडे,
डोळे लावुन ‘ राख ! रंजना, ’ गावें ईशापुढें.
पिता तयाचा तयास आला पुरता निर्जिवपणा,
जळुन शिंपले भट्टीमाजीं जेविं होतसे चुना.

अश्रु ९

जावी घेउनि प्रतिमा कारंची चोरुनि भिक्षा कधीं,
यावें परतुन बैराग्याच्या पुनरुपि वेषामधीं;
अंगावरचे तिनें उतरुनी नयनसुभग दागिने,
तयास करुनी अर्पण, रोखुनि लावावीं लोचनें;
चतकोर कधीं भाकर त्याच्या झोळीमधिं टाकितां,
गळुन पडावी भलतिकडे कधिं, तिच्याकडे देखतां.
ओघळलेल्या गालांवरच्या पुसुनी अश्रूसरी;
तयें करावें प्रयाण अगदीं निमूट विजनांतरीं.
धडधड करुनी हृदयाचें त्याचें उडत तियेच्या हृदीं;
तयें करावा तिच्या यापरी हृदिं प्रेमाचा निधी.

अश्रु. १०

दाढी भेसुर बघुनि–असावा गमे कुणा तस्कर,
पथीं चालतां, लवुनी मुजरा करिती कुणि सादर;
बिंदि, बिजवरे, वळि मोत्याच्या तयावरी शोभती;
आसक्ती ही कवणाची तरि ? होई कुंठित मती;
पिता तयाचा वनांत त्यातें भेटुन ये हरघडी,
सांत्वन त्याचें करि बसलेली असतां स्वारी सडी;
ध्यास त्यास परि " आणुनि द्यावी प्रतिमा माझी मला,
चला पिताजी ! येतो संगें द्या मज ती प्रेमला. "
तन्मुखिं मग पितयानें अपुल्या परि ठेवुनियां करा,
किति विनवावें ! " बोलुं नको रे ! असलें तूं वासरा ! "



# सर ५ वा

[ संक्रांतीच्या दिवशीं प्रतिमेच्या प्रेमाची भिक्षा घेतल्याशिवाय जाणार नाहीं अशा निश्चयानें रंजन राजवाड्याकडे आला असतां त्याचें छद्म उघडकीस येऊन त्यास तुरुंगवास भोगावा लागतो. त्यानंतर रंजन एका निर्जन कारागृहांत पडलेला आहे असें कळतांच प्रतिमा तेथील पहारेकऱ्यांस फितवून वेषांतरानें राहून त्यास अन्न पोंचविते. तरी पण वेडा रंजन प्रतिमेच्या नांवाचा जयघोष करीतच असतो. हें राजास समजून तो त्याचा सोक्षमोक्ष करून टाकण्याच्या इराद्यानें तुरुंगाकडे येतो. माझ्या हृदयांत प्रतिमेची मूर्ति कोरलेली आहे असें रंजन राजास सांगतांच प्रचीति पहाण्याकरितां खंजीर देऊन राजा ती दाखविण्यास सांगतो. रंजन रक्ताचा सडा पाडून आपल्या प्रेमवेडेपणाची कल्पना देतो. हें पाहून राजा त्यास हद्दपार करण्याचा विचार करतो. ]

अश्रु.

संक्रमणाचा सर्व जगाचा दिवस जधीं पातला,
क्रमाक्रमानें भीक मागुनी रंजन पथिं थबकला.
राजद्वारापुढतीं येतां जहराची वर पुडी,
प्रतिमा सज्जामधिं बसलेली; जशी फुलांची छडी.
" अगणित घरची भीक तुला बघ सुभगे ! ही आणिली;
प्यास एकल्या भिक्षेची परि एक मला लागली.
प्रेमाची तव पुरेपूरशी भीक घेतल्याविन "
वदला तो " नच शक्य मंगले ! जाणें मज येथुन. "
दिवसभरी बसलेला देखुन मूढापरी निश्चल,
वेडा समजुन केला कवणें बंदीमधिं दाखल. ४१८

अश्रु. २

परि उमगतां कोण्याकरवीं तो घातक रंजन,
तया डांबिलें तदा नृपानें तुरुंगांत निर्जन;
तुरुंग होता नगराबाहिर बालेकिल्लेवजा,
पाकोळ्या घुंगुरटीं तेथें होतीं भोगित सजा.
यमदूतासम दोन बैसले द्वारिं पहारेकरी,
आंत भुयारीं रंजन चित्तीं 'प्रतिमा प्रतिमा' करी.
अंमलदारें पाठविलेली खावि शिळी भाकर,
जर्णि रहावें वस्त्रें घेउनि गुपचुप अंगावर;
विवरांमधुनी हात काढुनी बागडणाऱ्या दुरी,
भाकर देउनि दावावी कधिं माया हरणांवरी.

अश्रु. ३-४

( विरही प्रतिमेनें रंजनाची काढेलली आठवण. )

( गजल )

" भेटशील कां तरि तूं येउनी कधीं आतां ?
बारखी मना सखया ! जाळते पहा चिंता !
ज्या दिनीं दिलें राया,
तूंहिया करीं हृदया;
पाहिल्या चिता जळत्या स्वप्निं रंगलें असतां.
डांकिणी उभ्या कुदती,
राहुनी क्षणीं भंवती;
डिंवचुनि मला पुढतीं पाहिल्या विकट हंसती.

पुष्प तुझ्या आवडिचें,
हुंगुनी गुलाबाचें;
ठेविलें उशीवर, तें पाहिलें निशा सरतां;
छिन्नभिन्न झालेलें
देखुनि मन घाबरलें;
दुश्चिन्हें मन भ्यालें, पाहुन ही अद्भुतता.
'प्रार्थना असे माझी,
होउं नको तूं राजी;
नृपकन्या तूं धन्या—रंक मी असे पुरता.'
वदलेलें आठवुनी,
अश्रु लोटती नयनीं;
नीच कसाबहि झालें मीच दिला तुज गोता.
उंडि करुनि देहाची,
ओंवाळिन मी साची;
प्राणांच्या प्राणा रे ! या तनुवर तव सत्ता. ४४३

अश्रु. ५

— आणि गाउनी असे करावे चाळे, वेडेपिसे;
मिष्टान्नें दासीनें बहुविध ठेवियलीं आणुनी,
चाखल्याविना तशींच जावीं मेजावर वाळुनी;
आल्यागेल्या निरोप द्यावा कळवळुनी अंतरीं,
'राजअंबिरा माझ्या आणा शोधुन कोणी तरी.'
परी ह्मणाली मनीं, लागतां तलास त्याचा तिला;
'वसंतकाळीं अंतरली हो ! तुह्मांस ही कोकिळा.' ४५०

अश्रु. २

परि उमगतां कोण्याकरवीं तो घातक रंजन,
तया डांबिलें तदा नृपानें तुरुंगांत निर्जन;
तुरुंग होता नगराबाहिर बालेकिल्लेवजा,
पाकोळ्या घुंगुरटीं तेथें होतीं भोगित सजा.
यमदूतासम दोन बैसले द्वारिं पहारेकरी,
आंत भुयारीं रंजन चित्तीं ' प्रतिमा प्रतिमा ' करी.
अंमलदारें पाठविलेली खावि शिळी भाकर,
जर्णि रहावें वस्त्रें घेउनि गुपचुप अंगावर;
विवरांमधुनी हात काढुनी वागडणाऱ्या दुरी,
भाकर देउनि दावावी कधिं माया हरणांवरी.

अश्रु. ३-४

( विरही प्रतिमेनें रंजनाची काढलेली आठवण. )

( गजल )

" भेटशील कां तरि तूं येउनी कधीं आतां ?
सारखी मना सखया ! जाळते पहा चिंता !
ज्या दिनीं दिलें राया,
तुझिया करीं हृदया;
पाहिल्या चिता जळत्या स्वप्निं रंगलें असतां.
डांकिणी उभ्या कुदती,
राहुनी क्षणीं भंवती;
हिंवचुनि मला पुढतीं पाहिल्या विकट हंसती.

पुष्प तुझ्या आवडिचें,
हुंगुनी गुलाबाचें;
ठेविलें उशीवर, तें पाहिलें निशा सरतां;
छिन्नभिन्न झालेलें
देखुनि मन घाबरलें;
दुश्चिन्हें मन भ्यालें, पाहुन ही अद्भुतता.
'प्रार्थना असे माझी,
होउं नको तूं राजी;
नृपकन्या तूं धन्या---रंक मी असे पुरता.'
वदलेलें आठवुनी,
अश्रु लोटती नयनीं;
नीच कसाबहि झालें मीच दिला तुज गोता.
उंडि करुनि देहाची,
ओंवाळिन मी साची;
प्राणांच्या प्राणा रे ! या तनुवर तव सत्ता. ४४३

अश्रु. ५

— आणि गाउनी असे करावे चाळे, वेडेपिसे;
मिष्टान्नें दासीनें बहुविध ठेवियलीं आणुनी,
चाखल्याविना तशींच जावीं मेजावर वाळुनी;
आल्यागेल्या निरोप द्यावा कळवळुनी अंतरीं,
'राजअंबिरा माझ्या आणा शोधुन कोणी तरी.'
परी म्हणाली मनीं, लागतां तलास त्याचा तिला;
'वसंतकाळीं अंतरली हो ! तुम्हांस ही कोकिळा.' ४५०

अश्रु. ६

पिलांकडे जशि कान घार दे जरि तळेप अंबरीं,
हिंडे आत्मा तेविं तुरुंगीं जरि बसली मंदिरीं;
फितूर केलें अंमलदारां, वेषान्तर साधलें;
फसकरनी चाकरी प्रियास्तव आम्हां फसवीयलें.
जिचें न पडलें सवित्याच्या तें नजरेलाही नख;
रूपगर्ववान् चंद्रा जीचें कधीं न दिसलें मुख;
तीच लागली वाहूं ओझें शिरीं पहा ! कोमला,
जीव तियेचा मुळीं तगेना असा प्रियावेगळा;
भाकर फेंकुन तिथें भरावीं पक्वान्नें स्वकृत,
चाकर होउन ताट करावें पुढतीं तें हांसत.

अश्रु. ७

द्वारपाल ते गेले होते भूपातें सांगुन,
'प्रतिमे ! प्रतिमे !' सदा गातसे कैदी आक्रंदुन;
प्रधानासवें यास्तव आला नरेश बंदीकडे,
आणि ऐकिले दीर्घार्तस्वर घुमलेले चहुंकडे;
पुढतिं देखतां तयांस घाली हांक तधीं रंजन,
'प्यारी प्रतिमा !' —रायें लत्ता त्यासरशीं हाणुन,
'दावि कुठें ती ?'— 'या हृदयामधिं' वदला रंजन मुदें,
देउनि खंजिर, 'हृदय फाडुनी ती दाखवि'! नृप वदे.
'घ्या ! ही प्रतिमा, घ्याच हवा तर जीवही हा बापुडा'
खंजिर फिरवुनि उरीं रुधिराचा पाडी भूवर सडा.

अश्रु. ८

रंजनावरी जरि खडतरशा विधि आणी संकटा,
संथ सागरापरी मुखावर विलसे त्याच्या छटा;
होति प्रियेच्या मूर्तीवर स्थिर नयनांतिल बाहुली,
जशी पहांटे चमकत तारा राही गगनांतली.
घेई झगडुन कदंब त्याच्या करिंचा मग खंजिर,
विस्मित होउन नृपाळ बसला मटकन धरणीवर.
अशी तपस्या प्रतिमेसाठीं त्याची ही देखुनी,
गळले अश्रू राजाच्याही झरझर नयनांतुनी.
प्रधानाचिया चिथावणीला पडला नृप परि बळी;
हद्दपार तरि त्यास करावा, मति ऐशी ळढविली. ४८०


अश्रु. ९

( भाकरी घेऊन जात असतां प्रतिमेनें तुरुंगाच्या मार्गावर गायिलेलें गीत. )

[ चाल — अजि अक्रूर. ]

“ मी थकलें रे ! चालुनि चालुनि वाट,
फिरविशी प्रभू कां पाठ ?
जल आटाल्या महानदाचा कांठ,
तेविं मी अशी मोकाट !

ते सिंधु ना-मी त्यांची ही गंगा,
भेटणार कधि ते सांगा ?
पोटाची केली बखळ,
पायांला पडले चाळ.
वणवणतें रानोमाळ,
ही खरोखरी आशा वेडी चीज,
जशि ढगांत चमके वीज.
हा केला ना त्यांच्या प्राण हवालीं,
कां करिति न ते रखवाली ?
त्या प्रेमाची जर नाहीं मज भूल,
दीपकावीण देऊळ.
परवडीच या कर्मांच्या,
आा केव्हां संपायाच्या,
सुकल्याहि कडा नयनांच्या,
हे ! करुणेशा ! सोडुन भेटायाला,
दे माझ्या त्या राव्याला !



# सर ६ वा.

—o—

( भिकारिणीचें मित्र करून एक दिवस रंजनाबरोबर पसार होण्याचा प्रतिमेचा बेत असतो. परंतु वेडेपणांत ( खरोखर तसें नसतें ) रंजनानें आपणांस जखमा करून घेतल्या आहेत असें तिला कळतांच औषधी वगैरे आणून त्याची ती सेवा करिते. थोडक्याच दिवसांत रंजनास हद्दपार करतात. हें कळतांच ती अत्यंत दुःखी होते. इकडे एका सद्गुणी राजपुत्राबरोबर तिचा विवाह ठरून तो मंगल दिवस जवळ ठेपलेला असतो. परंतु विधिघटना निराळीच असते. गुंजारवास रानांत मृगयेस जाण्याची बुद्धि होते व तेथें वृद्धावस्थेमुळें तो घोड्यावरून पडून कालवश होतो. )

अश्रु. १

गुपचुप होऊं पसार दोघें करुनी ऐशा मिषा,
हेत बेत संकेत ठेविला प्रतिमेनें हा असा;
लहर जाउनी रंजन होइल सजाण पूर्वीपरी,
अशी लागली बळकट आशा होती तिज अंतरीं.
उमेदींत या येतां कारागृहीं अशी एकदां,
न मिळे दर्शन, भयाण घडला प्रकार कळलें तदा.
“ माथें फिरुनी असे जाहला कैदी वेडापिसा,
जखमा केल्या अंगावर, जणुं ढाण्या वाघुट जसा ”
असें सांगतां द्वारपाल तिज कंपित करुनि स्वर,
निचेष्ट पडली बुरुजाच्या ताशि कलथुनि भिंतीवर.

अश्रु. २

किती विधाता असे तरी हा अद्‌भुत नवनाटकी!
प्रणयिजनांच्या असा रंगतो सदा सत्वकौतुकीं.
बाष्पासिक्तमुखमंडल पुसुनी धीर करुनियां तधीं,
नगरा जाउनि, बहू आणिल्या प्रतिमेनें औषधी.
कर विवरांतुनि पडतां बाहिर सोडुनि तैलें व्रणीं,
सुगंध नाना परिमळणारे द्यावे कारें ठेवुनी.
असें चाललें होतें बिनचुक अखंड अव्याहत,
वाटे नव्हतें जगच्चालका सारें हें संमत.
कृष्णकृत्यपटु परि प्रधानें करूनियां तांतडी,
पिंजऱ्यांतुनी दूर लाविला राघू देशोधडी!

अश्रु ३-४

क्षणभर होती प्रतिमा बसली विचारांत मंदिरीं,
व्यर्थ वाटली तिला तिची ती सारी कारागिरी.
" सांगू का हो? मंगल तुमचें जमून आलें असे,
खिन्न अशा कां राणीजी?" तिज छोटी दासी पुसे.
" दावूं काय मी एक गाउनी गज्जल बहु गोडसा,
आवडणारा खास तुम्हांला, असा असे भरंवसा.

( बालदासीनें गायिलेलें पद्य. )

( गज्जल. )

मधु बोल बोल राया। कां लाविलीस माया?
देखणा तूं ऐकुनि आशि दूर गेलेली स्तुती;
पातलें तुडवून सारे कोस पायांखालतीं;
नमवून शीर राया। तुज अर्पितेंच काया.

स्पष्ट प्रत
सं. ग्रन्थ नं. ११९८
ता.

घालुं का गुंफून माला या वनश्रीची तुला ?
कां फुलांचा रंग आणूं, लावुं का त्याचा टिळा ?
होशी न कां प्रसन्न । नयनीं कशास लाह्या ?

मारिल्या कैकांस मी नयनांचिया जरि संगिनी,
आज झालें चकित हरिणी कांति तूझी देखुनी;
विनती करून ऐशी । जाणार काय वांया ?

आस अधरांचीच तुझ्या मधु मिळावी वारुणी,
म्हणुनि आलें, परी फसलें; भग्नहृदया मी जनीं;
येणार झोंप याया । जहराचियाच पेया.

२ २ २

अश्रु. ५

तिला पाहिला राजपुत्र तो होता अति सद्गुणी,
मधमाशांपरि कैक भाळती तयावरी रूपिणी;
नगर तयाचें जणुं विलसे ती मनोज्ञ अलकापुरी,
दिल चाहिल तें तिथें मिळावें, प्रीती नारीनरीं;
झोंपुनि जाती निशीं विलासी उपवनिं नारीजन,
कधिं न बघे त्यां वारा डावा लावुनिया लोचन;
मनें जनांचीं फुलोरलेलीं विशुद्ध नीत्यादरें,
मधें असावी भरलेली जशि मधमाशांचीं घरें.
नेत्रांच्या हा पातें राणा तिथें करी हुकमत,
नामोच्चारें जळती दुरड्या पापांच्या अद्भुत.

अश्रु. ६

आली प्रतिमा कारागारीं गात गात मंजुल,
कळतां सारें, भूवर पडली होउनि दुःखाकुल;
अपयश कटुतर तिचिया होतें लिहिलेलें प्राक्तनीं,
ठाउक असुनी उडी घातली तिनें नेणतेपणीं;
भयाण होती नांदत शांती भोवतालिंच्या स्थळीं,
तिथें पडावी धूळ खात ना असली चांफेकळी!
जगदीशा! तव कुठें लोपला होता न्यायीपणा!
निसर्गा! तुवां कसें करविलें, शोभत जें दुर्जना?
वनराईतुनि, परमुलखांतुनि गिरीगव्हरांतुनी
कसें रंजना तुला परततां येना हें समजुनी?

अश्रु. ७

पहाच रसिका! किती चालली राजगृहीं धांदल,
काय वाटतें तुम्हांस येथें असेल चिन्मंगल?
प्रतिमेचा कां असे पातला विवाह–सुखसोहळा?
पूर्वतयारी त्याची कां ही? जो तो आपापला!
हिरे, माणकें, रत्नहारही, आले घेउन कुणी!
कुण्या शहरचे व्यापारी नृपद्वारावर तिष्ठुनी?
कलावतूचे नवनक्षीचे भर्जरिचे घालुनी
ऐटदार पोषाख हिंडती प्रासादीं हे कुणी?
कां राजाचे असती सारे भावी हे सोयरे
चलती त्यांची; नमती किति हीं त्यांच्यापुढतीं शिरें!

अश्रु. ८

मृतहृदयें हें प्रतिमा पाही लावुनियां लोचन,
शोकगीत तिज वाद्यांचा तो होई मंजुस्वन;
भुंवया होत्या विलसत पूर्वीं जणुं चंद्राच्या कडा,
तेज वाहुनी त्यांतिल, उरला गमे रिकामा घडा.
रोज चालले आरामास्तव वाळ्याचें विंझण,
दाहक होउन लावि कराया आजि अश्रूमार्जन.
आनंदाची भर सौख्याची गेली निघुनी हवा,
जीव कोंडला, तिचा लोपला ढगांआड चांदवा.
असेच येती ओंवाळाया उमराव तिला कुणी,
कलेवरासम स्तब्ध पडुन ती सारें वारि रोदनीं.

अश्रु. ९

लीलालाघव तुला साधलें जगताच्या नायका;
तुवां आणिला असा गोड हा अजि योगायोग कां ?
आला नाहीं जों न अंबरीं संरक्षक दिनमणी,
तुवां काढिलें मृगयेसाठीं भूपा नगरांतुनी;
वारू त्याचा कां न ठरेना मैदानावर असा ?
भाकित कळलें काय तयाला ? वा पुढली दुर्दशा !
अश्वपरिक्षक होते कां तधिं दडलेले ते कुठें ?
हुजऱ्यांचे ते शब्द तेवढे घ्यावे ऐकुनि मिठे !
कुचराईनें साऱ्यांच्याही तोंडाला काजळी
आज फांसली, गेलि भोंवल्या राजाला ह्या हुली.

अश्रु. १०

प्रधान, राजा, सेनानायक असे चालले तिथे,
भरलि एकल्या राजाची कां सहस्रावधी अघें ?
सावध जातां धुक्याधुक्यांतुन ओढा ओलांडुन,
पुढें लागली चढण थोडकी अरुंद मार्गांतुन;
तोल राहिना नृपा, बुजाला अश्वहि भग त्यांतुन,
राणाजीला अनर्थ दिसला, पुरी उडे गाळण,
ये सरसा क्षणिं लगाम तुटुनी राणा धरणीवर,
अचुक कसा लोपला अवसरीं कळे न विश्वंभर ! !
वय त्यांतुन तें उतार, आणिक शरिरहि तें निर्बल,
निवून गेला प्राण, परत कां येतो जल शिंपुन ?



# सर ७ वा.

—o—

[ पित्याच्या मृत्यूनंतर राज्याचीं सूत्रें प्रतिमेच्या हातांत येतात; परंतु तिच्या जीवाला शांतता नसते. तिचा प्रियकर वेडा होऊन रानावनांत फिरत असतो; व त्याचाच तिला ध्यास लागलेला असतो. लग्नसोहळा उरकून घेण्यासाठीं कदंब तिचें आर्जव करतो; परंतु तें निष्फळ होतें. ती गाण्याच्या जलशाचा घाट घालते. त्या जलशाचे स्थळीं तिचा वेडा प्रियकर गात गात प्रवेश करतो. त्या दशा स्थितींतही त्याचा ती स्वीकार करते व राजवाड्यांत ठेवून घेऊन ती त्याला जीवापलिकडे जपते.]

अश्रु. १

हाःहाकारचि पुरा उडाला नगरीमाधिं चहुंकडे,
दुःखी होउन जो तो येउन राजमंदिरीं रडे;
मंगल कार्यीं, मंगल समयीं, वाजति जे चौघडे
बंद जाहले; गेले सुकुनी पानांचेही विडे;
तिथें पातले अशी पहाया रसिक कळाचातुरी,
अशुभ पाहतां असें अचानक तया निराशा वरी;
बसली होती पूर्वीं हृदयीं प्रतिमेच्या डागणी;
आणि तिला ये भडभडुनी हें सारें अवलोकुनी.
तिनें त्यागिले विलास, पुरती झाली संन्यासिनी;
सूत्रें घेउन राज्याचीं करिं रमालि नयीं योगिनी.

अश्रु. १०

प्रधान, राजा, सेनानायक असे चालले तिघे,
भरलि एकल्या राजाची कां सहस्रावधी अर्घे ?
सावध जातां धुक्याधुक्यांतुन ओढा ओलांडुन,
पुढें लागली चढण थोडकी अरुंद मार्गांतुन;
तोल राहिना नृपा, बुजाला अश्वहि मग त्यांतुन,
राणाजीला अनर्थ दिसला, पुरी उडे गाळण.
ये सरसा क्षणिं लगाम तुटुनी राणा धरणीवर,
अचुक कसा लोपला अवसरीं कळे न विश्वंभर ! !
वय त्यांतुन तें उतार, आणिक शरिरहि तें निर्बल,
निघून गेला प्राण, परत कां येतो जल शिंपुन ?



# सर ७ वा.

—o—

[ पित्याच्या मृत्यूनंतर राज्याचीं सूत्रें प्रतिमेच्या हातांत येतात; परंतु तिच्या जीवाला शांतता नसते. तिचा प्रियकर वेडा होऊन रानावनांत फिरत असतो; व त्याचाच तिला ध्यास लागलेला असतो. लग्नसोहळा उरकून घेण्यासाठीं कदंब तिचें आर्जव करतो; परंतु तें निष्फळ होतें. ती गाण्याच्या जलशाचा घाट घालते. त्या जलशाचे स्थळीं तिचा वेडा प्रियकर गात गात प्रवेश करतो. त्या तशा स्थितींतही त्याचा ती स्वीकार करते व राजवाड्यांत ठेवून घेऊन ती त्याला जीवापलिकडे जपते.]

अश्रु. १

हाःहाकारचि पुरा उडाला नगरीमधिं चहुंकडे,
दुःखी होउन जो तो येउन राजमंदिरीं रडे;
मंगल कार्यीं, मंगल समयीं, वाजति जे चौघडे
बंद जाहले; गेले सुकुनी पानांचेही विडे;
तिथें पातले अशी पहाया रसिक कळाचातुरी,
अशुभ पाहतां असें अचानक तया निराशा वरी;
बसली होती पूर्वीं हृदयीं प्रतिमेच्या डागणी;
आणि तिला ये भडभडुनी हें सारें अवलोकुनी.
तिनें त्यागिले विलास, पुरती झाली संन्यासिनी;
सूत्रें घेउन राज्याचीं कारें रमालि नयीं योगिनी. ६१०

अश्रु. २

[ रानवनांत भटकत असतां रंजनानें गायिलेलें नेहमीचें गाणें. ]

[ जाति–स्वर्गंगा ]

" प्रेम हृदीं या, प्रेम जगीं या, प्रेम अमर एकचि असतें;
तोडुनि टाका देहाला या, नाश न होई त पुरतें.
प्रेमांतुनि जो पुढतीं जाई भेटाया चराचराला,
जिवाशिवाची भेट कराया त्यजि साऱ्या धर्मपथाला.
अनंतांत मधु मिसळुनि जाया त्याला आतुरता लागे;
पाउल हद्दित जरि विश्वाच्या नजर तयाची नच मागें !
सोडाया ही दूषित काया हांक सारखी ये कानीं,
उत्सुक होई चित्त तयाचें धांव घेइ पहिल्या सदनीं.
देवी ! प्रतिमे ! दास चालला रंगुनि पुढतीं तव भजनीं,
सोबत मागुन येशिल ना तूं सोडुन सारी ही अवनी !"

अश्रु. ३

कुठें बसावें आणि करावी गाण्याची मैफल,
पार वडाचे आणि मंदिरें घुमवावीं मंगल.
कैक चहाते तिथें रंजना मिळती येवोनियां;
गौरव करिती कितेक येतां त्यांच्या हें प्रत्यया.
शुद्धित असतां तयें करावें अखंड मधु गायन,
ज्या गाण्यानें दशा आणिली अशी तयालागुन;
विसरुन गेला होता जरि तो जखमांचे ते वण,
वेडरुपानें शर प्रेमाचे दिसति तया शोभुन;
निर्मळ चित्तें भजूं लागला प्रेमाच्या ईश्वरा,
त्या मूर्तिमाधिं दिसूं लागली त्याची ती सुंदरा.

अश्रु. ४

अपार वैभव कुबेरासही लाजविण्यासारखें
प्रतिमेपाशीं होतें, परि तिज होतें सुख पारखें.
असह्य होउन जाळूं लागला तिला एकलेपणा,
जेवीं गरिबी छळीत असते शयनींही निर्धना.
काळोखामधिं जसें पांखरू चुकलेलें ओरडे,
तसें चिंवचिंवे हृदय तियेचें एकाकी बापुडें,
तुटूं लागलें रंजनाविना पीळ पडुन आंतडें,
जीवनसारिता पात्र तियेचें बघूं पडे कोरडें.
गिरीदरेचा तिनें चोरला पुरा एकलेपणा,
पानांवरल्या दंवापरी ती करि अश्रूमोचना.

अश्रु. ५

पुढति प्रधाना अशी लागतां विस्कळलेली घडी,
आशांचीही तया लागली दिसूं सारखी मढीं.
प्रतिमेच्या हृदयांत वसतसे रंजन ही कल्पना
नव्हती त्याला, वदे दावुनी तिला लाडकेपणा.
"राणीजी हें प्रजेस संमत नसे असें राहणें,
विधवा ऐसी राजलक्ष्मी गैर दिसे ठेवणें;
तरी वरोनी तरुण करावा राज्यीं वारस उभा,
भेटीला किति आतुर झाली विद्वानांची सभा !"
"परी गुरूजी एक विनवणी तव चरणीं मम असे,
पुरवा त्याविण या चित्ताला मुळीं शांतता नसे.

अश्रु. २

[ रानवनांत भटकत असतां रंजनानें गायिलेलें नेहमींचें गाणें. ]

[ जाति–स्वर्गंगा ]

" प्रेम हृदीं या, प्रेम जगीं या, प्रेम अमर एकचि असतें;
तोडुनि टाका देहाला या, नाश न होई त पुरतें.
प्रेमांतुनि जो पुढतीं जाई भेटाया चराचराला,
जिवाशिवाची भेट कराया त्यजि सान्या धर्मपथाला.
अनंतांत मधु मिसळुनि जाया त्याला आतुरता लागे;
पाउल हद्दींत जरि विश्वाच्या नजर तयाची नच मागें !
सोडाया ही दूषित काया हांक सारखी ये कानीं,
उत्सुक होई चित्त तयाचें धांव घेइ पहिल्या सदनीं.
देवी ! प्रतिमे ! दास चालला रंगुनि पुढतीं तव भजनीं,
सोबत मागुन येशिल ना तूं सोडुन सारी ही अवनी ?" ६२०

अश्रु. ३

कुठें बसावें आणि करावी गाण्याची मैफल,
पार वडाचे आणि मंदिरें घुमवावीं मंगल.
कैक चहाते तिथें रंजना मिळती येवोनियां;
गौरव करिती कितेक येतां त्यांच्या हें प्रत्यया.
शुद्धित असतां तयें करावें अखंड मधु गायन,
ज्या गाण्यानें दशा आणिली अशी तयालागुन;
विसरुन गेला होता जरि तो जखमांचे ते वण,
वेडरुपानें शर प्रेमाचे दिसति तया शोभुन;
निर्मळ चित्तें भजूं लागला प्रेमाच्या ईश्वरा,
त्या मूर्तिमाधें दिसूं लागली त्याची ती सुंदरा. ६३०

अश्रु. ४

अपार वैभव कुबेरासही लाजविण्यासारखें
प्रतिमेपाशीं होतें, पारि तिज होतें सुख पारखें.
असह्य होउन जाळुं लागला तिला एकलेपणा,
जेवीं गरिबी छळीत असते शयनींही निर्धना.
काळोखामधिं जसें पांखरू चुकलेलें ओरडे,
तसें चिवचिवे हृदय तियेचें एकाकी बापुडें,
तुटूं लागलें रंजनाविना पीळ पडुन आंतडें,
जीवनसारिता पात्र तियेचें बघूं पडे कोरडें.
गिरिदरेचा तिनें चोरला पुरा एकलेपणा,
पानांवरल्या दंवापरी ती कारि अश्रूमोचना.

अश्रु. ५

पुढति प्रधाना अशी लागतां विस्कळलेली घडी,
आशांचीही तया लागली दिसूं सारखी मढी.
प्रतिमेच्या हृदयांत वसतसे रंजन ही कल्पना
नव्हती त्याला, वदे दावुनी तिला लाडकेपणा.
"राणीजी हें प्रजेस संमत नसे असें राहणें,
विधवा ऐसी राजलक्षुमी गैर दिसे ठेवणें;
तरी वरोनी तरुण करावा राज्यीं वारस उभा,
भेटीला किति आतुर झाली विद्वानांची सभा !"
"परी गुरूजी एक विनवणी तव चरणीं मम असे,
पुरवा त्याविण या चित्ताला मुळीं शांतता नसे.

### अश्रु. ६

गाण्याची मज आवड अतिशय तुम्हांस हें माहित,
म्हणुनी म्हणतें करूं एकदां मधु जलसा सांप्रत;
खास गवय्ये येतिल दुरचे सोडुन यमुनाथड,
कळून येईल त्यांसही माझी वेडीची आवड ”
प्रधान भुलतां प्रतिमेच्या मधु मायावी या वचें,
किती मनाच्या मळ्यांत उगवे गवत तिच्या पाचुचें !
शृंगारोनी दरबार तधीं गुंगुनि गेली मुदीं,
दुरदूरचे संगीतज्ञहि जमले लक्षावधी,
जाळीच्या मग पडद्यामागुन बसुनि संगमोत्सुका,
झालि पहाती जनसंमर्दीं प्रेमाची दीपिका.

### अश्रु. ७

ओलांडुनिया तटाक तैसे वाळूचे डोंगर,
रंजन आला तिथें घेउनी मेळा; भरलें पुर.
अद्‌भुतता ती जशी टाकते स्वप्नांतिल मोहुन,
तसा जाहला मोहनतारा प्रतिमेला रंजन.
पांघरुनीयां कुणि दिधलेलें त्यातें धवलांबर,
आणि चर्चुनी गंधही बहुविध विशाल भालावर,
दरबारामधिं गंधर्वापरि गात गात गायन,
प्रवेश करतां विद्वद्वर्यां टाकियलें मोहुन;
मुक्त जसा शशि नभीं होतसे राहूनें ग्रासिला,
तसा भासला रंजन येतां प्रतिमेला आजला.

अश्रु. ८

( रंजनानें दरबारांत प्रवेश करतांना गायिलेलें गाणें. )

( जाति—स्व[illegible] )

प्रेम हृदीं या, प्रेम जगीं या, प्रेम अ[illegible] एकचि असतें,
तोडुनि टाका देहाला या, नाश न होई तें पुरतें;
प्रेमांतुनि जो पुढतीं जाई भेटाया चराचराला,
जिवा शिवाची भेट कराया त्यजि साऱ्या धर्मपथांला.
अनंतांत मधु मिसळुन जाया त्याला आतुरता लागे,
पाउल इहिंत जरि विश्वाच्या नजर तयाची नच मागें;
सोडाया ही दूषित काया हांक सारखी ये कानीं,
उत्सुक होई चित्त तयाचें, धांव घेइ पहिल्या सदनीं;
देवी प्रतिमे! दास चालला रंगुनि पुढतीं तव भजनीं;
सोबत मागुन येशिल ना तूं सोडुनि सारी ही अवनी! ६८९

अश्रु ९

मिटलें दुःखें, पुन्हा विकसलें प्रतिमेचें अंतर,
तिलाच पटली ओळख त्याची, पटला त्याचा स्वर;
आणि पाहुनी झालेला बहु गाण्याचा आग्रह,
गात्रें झालीं बधिर प्रमोदें; जणुं प्रेमाचा तह;
तहकुब झाला दरबारहि मग तिचिया आज्ञेवरी,
तिचिया आज्ञेवरी आणिला तया महालांतरीं.
चमत्कार हा कुणा न कांहीं दरबारामधिं कळे,
विद्वानांच्या, गुरूजनांच्या पाणि तोंडचें पळे,
महाल झाला त्या दिवशीं तिज गमे पुरा साजरा,
आलेल्यां धनदानें केला समारंभही पुरा. ६९०

अश्रु. १०

नवरत्नांचे हार घातले तिनेंच त्याच्या गळां,
उंची वस्त्रानेंच सजविला देहांचा सांपळा;
मेवे उंची, फळें मधुरशीं चारूनीया स्वतां,
मुखाकडे ती त्याच्या पाहुन दावी शालीनता;
तरी वदावें तिला ' न होशी प्रतिमा मम परिचियें,
खरी कुठें ती प्रतिमा माझी ' ? असें पुसावें तयें.
तिनें ' मीच ती मीच ' वदोनी गाळावीं आंसवें,
बेत रचावे सुखवायातें त्यातें किति नवनवे;
गोड दुधाचें आंबट होतें दाट जेंवि विरजण,
सुखस्वप्नांचें तिचिया झालें हिमकण हें पाहुन.

# सर ८ वा.

—o—

[ आज ना उद्यां रंजन पूर्ववत् होईल या आशेनें प्रतिमा आपली तपस्या चालविते. रंजनाच्या प्रतिमा तयार करून त्यांनीं आपल्या महालास शोभा आणते. व डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस जागून रंजनाच्या जीवास जपते. परंतु इतकें असूनही कदंबानें कपटबुद्धीनें महालांत ठेविलेला एक हुजऱ्या पहांटेस " तुला प्रतिमा बोलावते आहे, चल. " असें वेड्या रंजनास बतावणी करून त्यास मारण्यासाठीं ह्मणून रानांत घेऊन जातो. हा हुजऱ्या अत्यंत दुष्ट असतो. ज्या रानांत प्रधान व तो रंजनास घेऊन येतात त्याच रानांत त्यानें पूर्वीं आपल्या प्रिय मित्राचा प्रेमाच्या स्पर्धेमुळें खून केलेला असतो. याच रानांत रंजनास तो आज वार करून बेशुद्ध करतो. त्याच वेळीं प्रतिमेला भयानक स्वप्न पडतें व स्वप्नांत कोणी भीषण आकृति तिला तिच्या प्रियकराचें हृदय सुवर्ण पात्रांतून अर्पण करीत आहे असें पाहते. ]

अश्रु. १

प्रधानास तें नव्हतें उरलें दुसरें गत्यंतर,
रंजन बसतां राज्यपदावर भलतें स्थित्यंतर;
विघ्न असें जारि उभें तरी तो होता ना चालक,
तयें योजिला कारस्थाना अपुलाही हस्तक;
खोल तयाच्या कल्पकतेचीं गेलीं पाळेंमुळें
तयें पाहिलीं होतीं पूर्वीं बहुत अशीं वादळें
चातुर्यानें, बुद्धिबलानें, घाट नवा घातला
हुकणारचि ना डाव दयाघन! प्रतिमेचा कोमला;
खेळत होत्या लाटा तिचिया मोदाच्या हृत्सरीं,
तोंच घडुनियां आलें कैसें भलतें मध्यंतरीं. ७१०

अश्रु. २

आशा मनिंची रंजनाचिया प्रेमानें माखली
आज ना तरि उद्यांच होइल, म्हणुनि सोनपाकळी,
रोज रोज नव कोच आणुनी छान रत्नमणिमय,
सजवावे बहु, तसे फिराया शृंगारावे हय.
हररंगांच्या पोषाखाचे अंगावर मीलन,
रंजनाचिया दिसतां, होई तिज सुखसंवेदन,
अंगा लावुन सुगंध नाना, स्नान तया घालुनी,
स्वतः प्रेरणा होइल तैसें ठेवावें सजवुनी;
अनेक मोठ्या लहान प्रतिमा करुनि रंजनाचिया,
लटकत ठेवी भिंतीवर ती तन्मय होवोनियां.

अश्रु. ३

नवल विलक्षण असें ऐकुनी राज्यामधले जन,
दो हृदयाचें असें पहाया येती हें नर्तन.
त्यजून सारीं रिवाजरीती लौकीकही बंधन,
तिनें फिरावें धरुन रंजना हातीं सौधांतुन.
मुकुट ठेउनि शिरीं तयाच्या करावया वंदन
शिकवावें नित, होतां पुढतीं त्यास प्रजादर्शन;
परी बघुनियां नयनिं चमकते त्याच्या तेजःकण;
बुधजन इच्छिति खरेंच पायीं घ्यायातें लोळण,
करून इतकें चिंता तिज कीं घडेल अनपेक्षित,
म्हणुनि असे ती सदासर्वदा हृदयामाधिं दुःखित.

अश्रु. ४

किति काढविल्या प्रतिमा बिलगुन बसुनीयां उभयतां,
रंगावलिची चित्रकार ते दाविती बहु कुशलता;
चित्रांनीं, प्रतिमांनीं फुलतां हर्म्य मनासारखा,
गाऊं लागे हृद्वीणेवर ती मधु अभिसारिका.
त्या तानांनीं, त्या गाण्यांनीं होउनि बाष्पाकुल,
करी तियेला अज्ञात कुणी क्षणोक्षणीं व्याकुल;
अचल पाहरा दो नयनांचा ठेवुनि रात्रंदिन,
तिनें रहावें बघत प्रियाच्या हृदयाचें स्पंदन;
धवल लेवुनी वस्त्र तनुवरी योग्यचि जोगीणिला,
त्याच्या संनिध राखित अपुलें प्रेम बसे प्रेमला !

अश्रु. ५

असे प्रधानें विश्वासांतिल ठेवियला सेवक,
राहि महालीं प्रतिमेपुढतीं लवुनीयां मस्तक;
वरून वागे पित्यासारखा साधा भोळा बक,
संपादी नित प्रेम तियेचें बोलांनीं मोहक;
दुज्या महालीं शयन कराया सोडुनियां पोपटा,
प्रतिमा गेली; शिरे पाहुनी महालांत एकटा;
तिथें पहांटे वदे जाउनी रंजनास गांठुनी,
भेटायाचें असे तुला कां प्रतिमेला लागुनी ?
सांगुनियां ‘ ती दूर असे बहु वनीं उभी एकली, ’
तयास चढवुन अश्वीं नेई चढवायातें सुळीं !

अश्रु, ६

पूर्व क्षितीजीं रंग फडकती तेजस्वी तांबडे,
मदिरेचे हे सुरयुवतींच्या पाझरती कां घडे ?
अलक्त चिन्हें कीं पायांचीं सुरललनांच्या परी
काय उमटलीं नर्तन करतां असलीं हीं केशरी ?
उभा राहतो चंद्र ठेवुनी कसलीशी वासना,
म्हणुनि मशाली घेउन आल्या कायाचि देवांगना ?
स्वर्गींचा वा स्फोट पावतां ज्वलत् पर्वताचि कुणी,
हेमरसाचा लोंढा वाहे असा भडक त्यांतुनी ?
पूर्वसमीरें कां रजनीच्या भाळींचा कुंकुम
असा उधळिला अशी कराया येतां कालक्रम ?

अश्रु. ७

अहा! उभा हा कोण सारखा तेजपुरुष अंबरीं ?
किती चढविलीं वस्त्रें यानें लाल पीत भर्जरी.
काय असे हा भालदार कीं देवांचा लाडका,
विश्वशिरावर रंगित ठेवी काढुनियां पादुका.
पळून जातां चंद्र एकटा रोष ठेउनी कुणी,
असा तयाचा खून साधला नभाचिया निर्जनीं ?
देखुन जागा अशी माखली रक्तानें भेसुर,
तपासास कां ? आला कोणी म्हणुनी न्यायी सुर ?
अरुण हाच हो! यातें येइल रविराणा सोबत,
काय पहा कीं याचें आहे पहिलें हें संचित!

अश्रु. ८

प्रधान, सेवक पुढतीं; रंजन चाले मागाहुन,
अश्व तिघांचे-परी तयां जणुं आलेले समजुन,
पाय टाकिती पुढें न, सरतां सरितेच्या त्या जळीं,
त्याच जलामधिं जणुं पडलेला आठवला त्या वळीं.
सेवक होता कसलेला बहु कर्मामधिं दुष्कर,
मित्र आणि तो प्रेम करिती एका वनितेवर,
हेवा वाटुन त्याचा, आणुन शिकारीस ह्या वनीं,
घायाळ पुरा केला मित्रा शर वर्मी सोडुनी.
मोट बांधुनी जळीं टाकितां तयास, तासाप्रत
पुन्हां परततां तयें मारिला वारांनीं अगणित.

अश्रु. ९

त्याच अरण्यीं त्या गर्द वनीं, आले आजि चालुन,
खुणावूनियां ऐकांमेकां करिती मृदु भाषण;
'हवी काय रे ! प्रतिमा तुजला बोल ! बोल ! रंजना ?
तिजकरितां अजि शेवटची करि अपुली आराधना'
असें बोलुनी वार सेवकें केला पाठीवर,
प्रतिमेचा बहु बंबाळूनी पडला हृदयेश्वर !!
रुधिर वाहतां तनूवरोनी 'काय असे घातकी'
टपटपणारे थेंब बोलती वाणी जणुं नेमकी.
साखर झोंपीं अशी पडुन कां ? जीवाची दौलत
तुझी चालली प्रतिमे ! वेडे ! ऊठ ऊठ सांप्रत.

पाहत होती स्वप्नभयानक गुंजारव-आत्मजा,
त्या समयाला भीतिग्रस्ता लाउन नलिनांबुजा;
ढगांस काळ्या लाजविणाऱ्या जणुं, जमवोनी छटा
स्वप्नामधल्या केलेल्या त्या पुरुषाचा मुखवटा.
कभिन्न अगदीं उभा घालुनी आंगीं झगा काजळी,
नयन चमकवी मृतजीवांची काय उभी साउली.
तयें आणुनी पुढतीं केलें सुवर्णपात्रांतुन,
आणि काय तें ? हृदय प्रियाचें तिचिया उडतें पण !!!
लख्ख होउनी प्रकाश झाली अदृश्य ती आकृती,
भ्रष्ट जाहली मती तिची; तें स्वप्नाचि कीं जागृती.

# सर ९ वा.

[ अदृश्य होऊन तो काळपुरुष पुन्हां स्वप्नांत तिला दिसतो. रंजनास रानांत पुरून त्याच्या छातीवर शिळा रचून ठेविलेल्या असून तो तशा स्थितींत देखील तिची आठवण काढीत आहे असें सांगतो. त्यासरशीं प्रतिमा जागी होते व राजवाड्यांत प्रियकराचा शोध करते. परंतु व्यर्थ! दिवसेंदिवस तिला क्षीणता येते. हें पाहून शेवटच्या घटकेस तिचा विवाह घडवून आणण्याचा कदंब प्रयत्न करतो परंतु भावी वराच्या हातांत हात देण्याच्या पूर्वींच ती इहलोक सोडून जाते. सारी प्रजा हळहळलेली पाहून प्रधान तिचें स्मारक उभें करतो. अद्यापही त्या स्मारकाच्या स्थळीं तीं दोघें कधीं कधीं आढळत असें म्हणतात. ]

अश्रु. १

अतृप्ततेनें तिनें प्रियाचें सेवुनि अधरामृत,
निद्रा होती घेत सुखानें मनिं होउनि प्रमुदित;
दूर तियेची झाली होती त्या दिनिं विमनस्कता,
स्वप्नांच्या कौमुदींत झोंपी गेली उत्कंठिता;
हृदयलतेवर आल्या तिचिया बहरुन साऱ्या कळ्या,
प्रेम तरूला नवीन होत्या फुटलेल्या डाहळ्या;
आज रंजनें ‘ पटे मंगले! पूर्वींची ओळख ’,
असें बोलुनी शुद्धित सुख तिज दिधलें वासंतिक;
असें असुनही कसा आज रे! रुसलासी मन्मथा ?
दुःखाच्या खाईंत वाढणें-कां प्रीतीची प्रथा ? ८१०

अश्रु. २

पुनरुपि येउन उभा राहिला काळपुरुष तो पुढें,
आणि स्फुंदुनी दो हातांनीं नयन झांकुनी रडे;
डोळ्यांतुनियां अश्रु वाहती त्याच्या बहु तांबुस,
काय धांवतो गमलें तिजला जणुं लोहाचा रस;
बोले तिजला "झाला पुरता प्रेमाचा तव क्षय,
निमिषार्धीं तव हृन्मणि घेइल निद्रासुख अक्षय;
नांवाचा तव त्यानें आहे चालविलेला स्तव,
क्षणाक्षणाला देहाचें जरि होत चाललें शव;
खाचेंत तया दोहातांच्या मृतप्राय पाडुन;
रान पालवी, माती, तनुवर ठेवियलीं ओढुन.

अश्रु. ३

उशास ओंडा, अजस्र आणिक छातीवरतीं शिळा,
देह तयाचा राठलतांच्या रज्जूनीं बांधिला.
घमघमणारे केंसावरचे सुगंध हुंगित कुणी
भुंगे आणिक रोही वनिंचे येति तिथें धांवुनी;
चुकचुकती त्या वनांत कीटक, पक्षी तीं श्वापदें,
झुळझुळणारे ओढे गाती भेसुर भेसुर पदें;
लता गाळिती फुलें तयावर, पर्णें तरु लोभुनी,
सारीं हळहळती ती तेथें वनांत द्रव पावुनी;
तिथेंच प्रतिमे ! माती पडुनी नयनीं आणिक मुखीं,
दिल्‌वर पडला तुझाच—आहे अझुनि तया धुगधुगी.

अश्रु ४

भुंवया त्याच्या धनुष्याकृती झालेल्या मळकट,
तुझियास्तव त्या उघड्या असती अझुनी अर्धस्फुट;
कुणी न सोबत रात्रीं यास्तव होऊन तनु पुलकित,
चित्त तयाचें ढगाळुनीयां आहे भयकंपित.
खिन्न न लवही येतें ह्मणुनी मरणचि आकस्मिक,
भेट न सरतीं तुझी जाहली यास्तव त्यास न सुख !
तुला गोड कां अझुनि राजसे ! हीच परांची उशी,
वनीं एकला राजहंस तव, करिशि न कां चौकशी ?
अजुन न येशी ह्मणुनि वेदना तयास बलवत्तर,
जाउन कधिं वद टिपें गाळशिल त्याच्या प्रेतावर ?

अश्र. ५

जसें फाडिते विलसुनि चपला मेघावृत अंबर,
वदुन एवढें तमस्सागरीं अदृश्य झाला नर;
त्या तेजानें त्या दीप्तीनें उठुनी शय्येवर,
प्रतिमा बसली; जणुं वियतींचें काय अढळ पुष्कर !
स्फुंदत स्फुंदत महाल सारा तिनें बहू धुंडिला,
तुटल्या उल्केपरी कोसळे महालांत विव्हला;
वाऱ्यानें हलणाऱ्या सुरुच्या रोपापरि कंबर
जिची; तिनें परि कसा सहावा शोकाचा डोंगर?
निशीं पसरुनी कवटाळाया प्रियास कर गुल्मशी,
करुण रवें ती बोले ‘ प्राणा ! भेटाया ये मशीं ’

अश्रु. ६

रडुनी रडुनी तिनें मांडिलें महालांत तांडव,
अन्नाला वा पाण्याला ती स्पर्श न करि कधिं लव;
लाजराखण्यापुरतीं वस्त्रें अंगावर लेउनी,
रंजनाचिया प्रतिमातें ती असे सदा बिलगुनी;
कुणा लक्षितां बसत असे जी होउन लज्जारुण,
पुसे " मारिला रावा कुणि' ? आजि प्रधानास झोंबुन.
रोमांच तसे कदंबाचिया तनुवर राहुनि उभे,
तया सांगती ' अघोर नडले तुझेच हिज मनसुबे'
कळुन न तिज ये दिनरात्रीच्या तेजाची सांडण ;
कळे न तिज कधिं रात्र संपुनी लपतें तारांगण !

अश्रु. ७

बावुन जाते जशी तोडिली वसंतांत कमलिनी,
तशी चालली क्षणाक्षणाला क्षीण होत शतगुणी ;
देह त्यजुनियां जीव तिचा तो दोनयनांमधिं उरे,
वाती हातांच्या पायांच्या बघुनी मन घाबरे ;
तऱ्हेतऱ्हेचे अलंकार—जणुं नक्षत्रांच्या वळी,
तिची न शोभा—म्हणून तयांची प्रभा क्षीण जाहली.
तिनें फाडिलीं वस्त्रें ऐसा कोसळतां गिरिकडा,
हातांनीं मृदु तोडुन काढी सुंदर कुरळ्या लडा ;
हाय ! हाय ! अशि तिच्या लोपली प्रेमाची पौर्णिमा ;
....आणि पातली मेसुर कोठून नाशाची ती अमा !

अश्रु. ८

( प्रतिमेनें गायिलेलें अखेरचें शोकगीत. )

( जाति–चंद्रकांत. )

कां झालास अबोल? राजसा!
कां झालास अबोल?
आयुष्याचा एकाएकीं सुकला तव ओहोळ्,
कडू लागलें प्रीतीचें कां माझ्या तुज मोहोळ्?
दगदगींत या निघून गेला अर्धा संवत्सर;
पिकल्या पानापरी कळा ये प्रतिमेला पांडुर.
गात्रें झालीं पांगुळ अगदीं लवति न कधिं पापण्या;
जणुं मरणाच्या तिनें सारल्या चालविल्या विनवण्या.
डोळे दोनच काय तेवढे तिजला ते मंडन;
जसें आणतें शोभा अभिनव चंद्रा मृगलांछन.

अश्रु. ९

घडवुन आणी प्रधान दुसरा यास्तव कार्यक्रम,
हेतू त्याच त्यामधिं होता कांहींतरी अंतिम;
पाहुन पडली निपचित शयनीं महालांत कृत्तिका,
तयें ठरविलें चारायाची तिला पुरी मृत्तिका.
कुमार पूर्वीं ठरलेला अजि आणुनियां सत्वर,
वदे तिला ‘ कर पाणिग्रहणाचि योग्य तुला हा वर ’.
डोळे उघडुन तिनें देखिलें, रडलि मनीं दारुण,
करग्रहणाच्या आधीं केला देहाचें कृष्णार्पण!!
हाय! कदंबा! हाय! रंजना! प्रतिमा मम गोमटी,
विश्वाच्या प्रतिमेंत मिसळुनी गेली ना शेवटीं!!!

अश्रु. १०

रडलें त्रिभुवन, रडले सज्जन, रडले जन शेंकडो,
चंचलेंत या म्हणती पुनरुपि कधीं न ऐसें घडो;
अशुभ सारखीं स्वप्नें पडतीं महालांत परिजनां,
बरळुन उठती पुरुष घरोघरिं भीती नारीजनां;
तिचें असावें प्रजेस गमलें चंचलेंत द्योतक,
म्हणुनि कदंबें बांधुन दिधलें भव्य तिचें स्मारक;
तिथें बांधल्या फेनधवलशा कीर्तिमंदिरापुढें,
सुमें गुलाबी उधळित येती दोहृदयें अलिकडे;
ज्यामासीं ज्यादिवशीं गेली प्रतिमा जग सोडुनी,
त्या रात्रीं दरमासीं घडतें असेंच, वदती कुणी. = १००

५३६७
REFBK-0005367
REFBK-0005367